पापी सत्तेचा नष्टांशकाल

व

भारताचा उद्धारकाल दर्शक

संगीत ऐतिहासिक' कीर्तन—रत्नमाला.

## प्रथम रत्न

सांप्रतच्या शुद्धि चळवळीचे विकृति विनाशक वीर

कर्मयोगी

# पण्डित जगन्नाथराय

कृत

# यवन—वधू—उद्धार.

पूर्वार्धांत

## छत्रपति शिवरायकृत शुद्धिकरण

किंमत चार आणे.



संगीत ऐतिहासिक कीर्तन रत्नमालेस

## आचार्यांचा शुभाशिर्वाद.

### श्रीमज्जगत्गुरु श्री शंकराचार्य [डॉ. कुर्तकोटी]

मठ करवीर यांजकडून वेदोक्त आशिर्वाद पूर्वक कळविण्यांत येतें कीं:—

आपल्या मालेचें पहिलें रत्न पंडित जगन्नाथराय अर्थात् यवनवधू उद्धार हें श्रीनीं वांचून पाहिलें.

धर्म प्रसाराची जी अनेक साधनें आहेत त्यांत 'कीर्तन' हें पूर्वीपासून अगदीं सर्वमान्य आणि प्रमुख असें साधन आहे. ही गोष्ट लक्षांत आणून आपण जी ऐतिहासिक कीर्तनमाला सांप्रतच्या काळास योग्य अशा पद्धतीनी व युक्त अशाच विषयांनीं सुरू केली आहे ती अभिनंदनास पात्र आहे. धर्म रक्षणासाठीं आजकाल केवळ पौराणिक आख्यानें सांगण्यापेक्षां अलिकडील इतिहासांतील आख्यानें लाविल्यानें समाजावर इष्ट परिणाम होऊन तो कार्यक्षम होऊं शकतो.

यादृष्टीनें आपली माला सनातन धर्मांचे यथार्थ ज्ञान करून देऊन तरुण पिढीस योग्य वळण लावील असा भरवसा वाटतो कळावे.

—श्रींचे आज्ञेवरून—

# संगीत ऐतिहासिक कीर्तनरत्नमालेची आवश्यकता.

श्री आद्य शंकराचार्यांनीं मण्डणमिश्रास वादपराजित करितांच मण्डण मिश्र आचार्यांस ह्मणतात—

भो यते पराजयेनानेन नाभि नवेन नाहं विषाद प्राप्तोस्मि. किन्तु सर्वज्ञस्य जैमिनेर्वचनानि खण्डितानि । इत्येवे हेतोः खिन्नोऽस्मि । यदि जैमिनिसूत्राणि खण्डितानि कथं तर्हि जैमिनेः सर्वज्ञत्वम् ।

ही मण्डणमिश्रांची शंका ऐकून आचार्य म्हणतात—

न जैमिनेरभिप्रायः खण्डितः किन्तु वयमेवानभिज्ञतया मुनेरभिप्रायं न सम्यक्प्रतीमहे ।

मण्डणमिश्र— यदि कविजनाविदितो जैमिनिमुनेः कश्चित् अभिप्रायो विद्यते तर्हि तं वर्णय

आचार्य— परे ब्रम्हण्यभिप्राययुतानपि विषयेषु प्रवाहीकृत बुद्धिस्तत्वानधिकारिणोऽनुग्रहितुमिच्छुरसौ मुनिर्जैमिनिः परब्रह्मप्राप्तिसाधनतया परं केवलं कर्मातिशयं निरूपितवान्न तु परंब्रम्हेति । अस्य ' यज्ञेन दानेन तपसा नाशकेनेति ' श्रुतिवचनमेव प्रमाणम् । एव स्वाशंका साधारं खण्डिता अवलोक्य मण्डनोपि सानन्दोऽभूत् ॥

* * * *

वेद शद्बार्थ— इष्टप्राप्य अनिष्ट परिहारयः अलौकिक उपायं यो ग्रन्थे वेदयति स वेदः

वेदांतील गूढ फलश्रुति—

## ओव्या

सद्गुरू मुखें वेदान्त श्रवण । परस्पर ते बोध कारण ।
मुख्य तप हें निर्वाण । बोलती साधू पंडित ॥
ऐकाग्र्यं परमं तपः । ब्रम्हाहमिति वै जपः ।
आत्मज्ञानीच सोमपः । मुख्य जप तप याग हे ॥
जेथें जेथें वेदा पडिलें मौन । तेथें त्यातें बोलती स्तंभन ।
भक्ति भावे हरि मोहन । वशीकरण तें इंद्रियांचें ॥

विषया पासोनि उच्चाटन । अहंकाराचें मारण ।
फलश्रुतीची अंतर्खूण । गुह्य जाणा गुरुमुखें ॥
पुत्रादिकांची प्राप्ती होती । बोध पुत्र तो जाणाचित्तीं ।
दिव्य कन्या क्षमा शांती । फलश्रुती ही जाणावी ॥
साध्वी दारा स्वानुभूती । विमल ज्ञानाची संपत्ती ।
ऐशा अनेक फलश्रुती । गुह्य असती वेदांच्या ॥

॥ ज्ञानसागर ॥

* * * *

दौलताबाद येथील सुप्रसिद्ध सत्पुरुष पैठणच्या नांथांचे गुरु-

## श्री जनार्दनस्वामी

याजकडे एक वे० शा० सं० शास्त्रीबुवा येऊन म्हणालें महाराज—

### ओवी

मी वैदिक पट्टीचा । अभ्यास केला वेद विद्येचा ।
रथक्रमा पर्यंत साचा । परी न कोणी विचारी ॥

### दिंडी

सहा शास्त्रे चौसष्ट कला पाही । पुराणांचा विस्तार कथूं कायी ।
अशा माझ्या विद्येस जगीं माना । देऊनियां कुणि मान डोलवीना ॥

हें त्या शास्त्रीबुवांचें भाषण ऐकून जनार्दनपंत म्हणतात—

### आर्या

शास्त्रें श्रुती पुराणें सन्मानासी जगांत मिळवाया ।
नच केली हो गुरुजी ! तो आहे मार्ग मुक्तिला जाया ॥

* * * *

वरील तात्वीक दृष्टांतावरून अगदी प्राचीन कालापासूनहि सनातन धर्माची गूढ तत्वें तात्कालीन जनतेस समजावी तशी न समजल्यानें उत्तरोत्तर कित्येक अनधिकारी धर्मोपदेशकांकडून त्याचें विकृतीकरण वाढत जाऊन आजच्या स्थितींत तर त्या तत्व विवेचनाचा कमालीचा अधःपात झाल्यानें एवढा परमोच्च व विश्वव्यापी असा हा आमचा सर्वांग परिपोषक सनातन धर्म पण त्या विषयी केवळ त्याच्या यथार्थ ज्ञानाभावी सर्वत्र शैथिल्यता उत्पन्न

झाल्याचें दिसून येत आहे ही गोष्ट स्वराज्य प्राप्तीस अत्यंत घातक आहे हें कोणीही विसरता कामा नये. धर्म शब्दाच्या व्यापक अर्थाकडे लक्ष देण्यापूर्वी प्रथम प्रत्येक हिंदु व्यक्तीस

## आर्या

कर्तव्यें नर होतो नारायण हाच प्रकृतिचा धर्म।
परवशता भार तिला आली शिकवावयास हें वर्म ।।

शिकवून आपल्या प्रकृती धर्मांची यथार्थ ओळख पटवून देण्याच्या पवित्र हेतूनेंच ही

## ऐतिहासिक कीर्तन रत्नमाला.

निर्माण झाली असून ती आपल्या यथार्थ ज्ञानानें पापीसत्तेचा नष्टांशकाल दर्शवून कीर्तनादि धर्मोपदेशकांच्या कार्यांत विलक्षण चैतन्य उत्पन्न करील तसेंच

## आर्या

श्री शिवचरिततुलाया जगदितिहासांत एक शिवचरित।
निजगत विभवा कांक्षि असाल तरि अनुसराल तें त्वरित ।।

अशा या जगत्वंद्य छत्रपती शिवचारित्र्यांतील अत्यंत हृदयस्पर्शी प्रसंगावरील तेहतीस आख्यानानें प्रत्येक हिंदी तरुणांचें रक्तांत दिव्य क्षात्रतेज उत्पन्न करून तद्वारा 'क्षतात् त्रायतेति क्षत्रियः' ही जाणीव चेतवील. झाशीची राणी, कमल कुमारी, इत्यादि २१ आर्य महिलांची चरित्रें

## शा० वि०

झाशी पत्तन पालिका नृवसना तुंगाश्व संचालिका।
हस्तोद्यत्कर बालिका रणमदोन्मत्ता यथा कालिका ।।

या दृष्टीनें अथवा

पत्यौ स्वर्ग मितो गते शिव प्रभो किं जीवितेन स्त्रियः।
सानूनंशवतोप्य मंगल तरा तस्यास्य एवा सवः ।।
तस्मादस्मि दिवं प्रभो जगमिषुः कन्याज्यह्येषा तव ।
मार्गंतत्र निरीक्षितेहि दयितः तऽद्रागनुज्ञायताम् ।।

या पवित्र भावनेनें विसाव्या शतकांतील व्यक्तिस्वातंत्र्याची बेवकूब चर्चा करणाऱ्या हिंदस्त्रीच्या अंतःकरणांतही दिव्य सतीधर्म निर्माण करून आपल्या स्मारकाकडे अवलोकन करणाऱ्या आर्य तरुणास

## पद

रे हिंदबालका थांब । या स्थळीं अश्रु दोन ढाळी ॥

असें सांगून त्याची चित्तवृत्ती आपल्या पवित्र चारित्र्याकडे वळवून आमच्या सारख्या कथालोलुप दगडास

गातील इथें शाहीर । लवावितील माना वीर
तरु झरे ढाळतील नीर । या दगडा फुटतील जिभा
कथाया कथा सर्वकाळीं ॥

अखेरचा हा मार्ग दाखवितील.

ऐतिहासिक कीर्तन रत्नमालेंत आद्य श्रीशंकराचार्यांपासून शिवसमर्थ काला पर्यंतचा सुमारें दोन हजार वर्षांचा काल गृहित धरून हिंदवी राष्ट्रास ललामभूत अशी तात्कालिन जी नररत्नें व स्त्रीरत्नें हिंदी राष्ट्राच्या उत्कर्षास प्रत्यक्ष कारणीभूत झाली त्यांची यथार्थ संगीत चरित्रें (वेळोवेळीं जशी मिळतील तशीं) गुंफण्याचा संकल्प आहे.

या शिवाय भारत, भागवत व रामायण यांतील आजपर्यंत प्रसिद्धीस न आलेली व सद्यःस्थितीतील विचाराला परिपोषक अशी ही कित्येक संगीत चरित्रें स्वतंत्रपणें प्रसिद्धीस आणण्याचा आमचा विचार आहे. कीर्तन साहित्य संग्रहदृष्ट्या विनोदी लघुकथा, दृष्टांत रत्नावली, स्वातंत्र्याची स्फूर्तिदायक गीते अलंकार दीपिका, संगीत पद्यमाला, ऐतिहासिक लघुकथा, इत्यादि लहान मोठी पुस्तकें स्वतंत्रपणें लिहिण्याचें कार्य चालू आहेच. सारांश डेमी ६४ पृष्ठांचें एक पाक्षिक सतत १२ वर्षे चालविण्या इतकी वरील प्रकारची साधन सामुग्री आज आमचे जवळ तयार आहे. परंतु भाग्यशाली अशा एखाद्या धनवानाची दृष्टी इकडे वळेपर्यंत निराश न होतां हें कार्य हळूहळू चालवून


यातूनच पुढील मार्ग चोखाळण्याचें आह्मीं योजिलें आहे. अगाऊ पत्रव्यव-हार करून मालेच्या वार्षिक वर्गणीदारांची ठराविक नांवनोंद पुरी होतांच मालेस मासिकाचें स्वरूप देऊन त्याची वार्षिक वर्गणी फक्त तीन रुपयेच ठेवण्यांत येईल. तो पर्यंत या रत्नमालेचें प्रत्येक रत्न १ विजयादशमी, २ मकरसंक्रांत ३ रामनवमी ४ आषाढी एकादशी यांप्रमाणें अगदी नियमित प्रसिद्ध होत जाईल. त्या त्या वेळीं प्रत्येकी ८५ आण्याची तिकिटें खालील पत्यावर पाठवून मागणी करावी वृत्तपत्रांतील जाहीरातीच्या फाजील खर्चास येथून पुढें बळी पडण्याची मालेंत शक्ति नाहीं. अगाऊ एक रुपया पाठवि-ल्यास मालेची ४ पुस्तकें ट० खर्च न घेतां पाठवूं मासिकाच्या बाबतींत गणीदाराचे यादींत एक कार्ड पाठवून नांव नोंदविण्याची जितकी त्वरा कराल तितक्या लवकर मासिक पुढें येईल, कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार खालील एकाच पत्यावर करावा.

शेवटीं ज्याच्या प्रेरणेनें हे कार्य चालविण्याची स्वयंस्फूर्ती अंतःकरणांत निर्माण झाली त्या सर्वव्यापी आत्मारामाचें अखंड चिंतनातच ही वाढलेली प्रस्तावना पुरी करून वाचकांचें अभिष्ट चिंतन करतो.

ऐतिहासिक कीर्तन रत्नमाला
कार्यालय, पंचवटी नाशिक.

**महादेव बाळकृष्ण खळदकर**
संपादक व प्रकाशक

॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥



१८८४

## दृष्टांत --- रत्नावलि

लक्ष्मिं प्रति सरस्वत्यया दुरुक्तिरियम् :—

### शा० वि०

हे लक्ष्मि क्षणिके स्वभाव चपले मूढेच पापेधमे ।
नत्वं चोत्तम पात्रमिच्छसि खले प्रायेण दुष्चारिणी ।।
ये देवार्चन सत्य शौच निरता ये चापि धर्मे रता ।
स्तेभ्यः कुप्यसि निर्दये गतमति नीचोपि ते वल्लभः ।।

सरस्वतिं प्रति लक्ष्म्याः प्रत्युक्तिरियम् :—

नाहं दुश्चारिता न चापि चपला क्षुद्रो न मे रोचते ।
नो शूरो नच पण्डितो नच शठो हीनाक्षरो नैवच ।।
पूर्वस्मिन् कृत पुण्य योग विभवः प्राप्नोति मे सत्फलम् ।
लोकानाम सहिष्णुता सखि कथं दृष्ट्वा तदीयं सुखम् ।।
ब्राह्मणाश्चिरदरिद्रा यतस्ते लक्ष्मिकृपारहिताः

एकदा सर्वे ब्राम्हणा मिलिता नारायण समीपं अपेत्य, उचुःदेव अस्मदालये पदमर्पयितुं लक्ष्मिदेवि मनुरुध्यस्व येन चास्माकं चिरदारिद्र्य-मप गमिष्यति. एतद् आकर्ण्य लक्ष्मि सरोषमाह 'नाहं कदापि ब्राम्हणालये पदं करिष्यामि' यदर्थे कारण :—

### शा० वि०

पीतो गस्त्येन तातश्चरण तल हतो वल्लभो न्येन रोषा ।
दाबाल्यात् विप्रवर्गे स्ववदन विवरे धारिता वैरिणी मे ।।
गेहं मे छेदयंति प्रति दिवसमुमाकांतपूजा निमित्तं ।
तस्माद् खिन्ना सदाहं द्विजगण सदनं नाथ नित्यं त्यजामि ।।

## द्वितीय दृष्टांत

### दिवाळखोर शेतकरी

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते ।
एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञमितितद्विदः ।। गीता

### ज्ञानेश्वरी ओवी

एक म्हणती हें स्थळ । जीवाचेनी समूळ ।
मग प्राण हें कुळ । तयाचें एथ ।।

देहरूप शेताचा जीव हा मालक व त्याचा शेत वाहणारा प्राण हा कुळवाडी होय.

जया प्राणाचिये घरीं । अंगे राबती भाऊ चारी ।
आणि मना ऐसा आवरी । कुळवाडी कर ॥

त्या प्राणाचे अपान, व्यान, उदान व समान हे चार भाऊ आंग मेहनत करणारे व मनासारखा अनेक उलाढाली करणारा चालक :--

तयांत इंद्रिय बैलांची पेटी । न म्हणे आवशी पहाटी ।
विषय क्षेत्री आटी । काढी भली ॥

पांच ज्ञानेंद्रिये व पांच कर्मेंद्रिये असे दहा बैल विषयरूप शेतांत रात्रंदिवस कष्ट करणारे ज्याच्या अखंड स्वाधीन असा हा सधन शेतकरी पाहूनच त्यास ही देहरूप शेती जीवांने लागणीस दिली परंतु त्यानें या शेतीची घाण करण्याचा यत्न चालविला :—

मग विधीची वाफ चुकवी । आणि अन्याय बीज वाफवी ।
कुकर्माचा करवी । राब जरी ॥

हा प्राण चंचल ( दिवाळखोर ) मनाधीन होऊन ( नोकरशाही-वर विश्वासून ) इंद्रियांच्या सहाय्याने नित्य विधीकर्माची वाफ चुकवून ( त्याग-करून ) उलट अन्यायाचे बीज पेरुं लागतो अर्थात् निषीद्धाचरण करुं लागल्याने :- -

यःशास्त्र विधीमत्सृज्य वर्तते कामकारतः ।
न स सिद्धि मवाप्नोति । न सुखं न परागतिम् ॥

## ओवी

तरि तयाचि सारिखे । असंभाव्य पाप पिके ।
मग जन्मकोटी दुःखे । जीव भोगी ॥

यामुळे हा भाग्यशाली शेतकरी सफाई बुडून दिवाळखोर ठरला अजूनही तो जर वेळींच सावध होऊन :—

नातरी विधीचिये वाफे । सत्क्रिया बीज आरोपे ।
तरी जन्मकोटि मापे । सुखचि पावे ॥

सूचना :— स्वातंत्र्याची स्फूर्तीदायक गीतें, संगीत विनोदि लघुकथा, दृष्टांत--रत्नावली, अलंकार दीपिका समस्यापूर्ती, ऐतिहासिक लघुकथा, बोधामृत शतपदी आणि भक्ति ज्ञान रहस्य ही प्रत्येकी ८ आणे किंमतीची आठ पुस्तके स्वतंत्रपणे छापून प्रसिद्ध होईपर्यंत ऐ० कीर्तन रत्नमालेच्या प्रत्येक रत्नातून त्यांतील उतारे क्रमवार थोडक्यांत देण्याचें आम्हीं योजिलें आहे.

*संपादक*

श्रीराम

# संगीत विनोदी लघुकथा

नारायणं नमस्कृत्य नरंचैव नरोत्तम ।
देवीं सरस्वती व्यास ततो जयमुदीरयेत् ॥

## सीता विनोद

राम सीता प्रेम विलासांत मग्न असतांना प्रेमभरांत सीता रामास म्हणते कीं मजवर आपलें खरें प्रेम असेल तर–

### श्लोक

मद्रूपधारि त्वं राम विहरस्य मयासह ।
धृत्वा त्वद्रूपमद्याहं विहरामि त्वयासह ॥

आपण माझे स्वरूप घेऊन माझ्यासह विहार करा व तुमचे स्वरूप (वेष) मला देऊन मी तुमच्यासह विहार करीन. हें सीतेचें लाघवी भाषण ऐकून राम तिला ह्मणतात–

### आर्या

अनुचित भाषण पुनरपि, न वदावे त्वां प्रिये कदा काळीं ।
रघुवंश श्रेष्ठ आम्हीं आह्मां हे निंद्य वाक्य बहु जाळी ॥

'आमच्या सारख्या रणशूर वीरानी स्त्रीवेष घेणें हे अत्यंत निंद्य होय' हें रामाचें भाषण ऐकून त्या मानी सीतेस ह्या आपला अपमान झाला असे वाटून ती रागावून रामापासून दूर जाऊन बसली. तेव्हां आपला अवतार भक्त मनोरथ पूर्ततेकरितांच आहे हें ध्यानीं आणून सीतेकडूनच तिचें स्वरूप रामानी धारण केलें. शेवटीं सीतेने रामाची–

### कटाव

आपुल्या हातीं घातली वेणी । मूद राखडी केतकी वरती ।
बैसवुनि शशिफुलें गोजिरीं । सुख वाटे मग अंतरी सीते ॥

अशा रीतीनें सीतेनें आपलें स्त्रीरूप रामास दिल्यावर ते पाहून तिला मोठा संतोष वाटला.

## पद ( संतपदाची जोड० )

जानकी रूप धरे । रघुविर ॥ ध्रु० ॥
हातमो कंकन पगमो पैंजन । हार गळे विहरे ॥ १॥
पेहरी सारी, और कंचुकी । मृगमद तिलक भरे ॥ २॥

नंतर रामानें स्वहस्तें जानकीस रामवेष दिला.

## श्लोक

पीतांबरा चुंबित पादपद्मा ! वक्षस्थल क्रीडदवादि पद्माः ।
उमास्तुतां वंद्यभिराम भासे । सीताधनुश्चाप धराधरायाम् ॥

तुळसीदास ह्मणतात—

भयी जानकी रामरूप तब तुळसी चित्त हरे ।

अशा स्थितींत बराच काल प्रणयक्रीडा करून उभयता निद्रावश झाले. इकडे पहाटेस वसिष्ठऋषि उठून नित्याप्रमाणें तें रामाचें ध्यान करूं लागतांच त्यांस ते स्त्रीरुप दिसलें.

## श्लोक

श्रीराम ध्यान वेळायां किंचित् विघ्नमलक्षयत् ।

तिकडे शरयूतटाकी सर्व वानर मंडळी रामध्यान करित असतां त्यांनाहि राम स्त्रीरुप दिसलें तेव्हां सर्वजण मारुती जवळ जाऊन सांगतात कीं:—

## आर्या

अघटित संकट पडलें हृदयीं गमते पुन्हःपुन्हां ध्याता ।
राम न येता सीता कां येते सांग तूं जुना ध्याता ॥

मारुती म्हणतात—

## श्लोक

यदपि रघुपसीता पादयोर्नास्ति भेदः ।
तदपि मम मनस्तं राघवं ध्यायतास्मि ॥

### आर्या

प्लवगासी ह्मणे मारुति जाऊं भावे वसिष्ट गुरुपाशीं ।
त्यांनाचि हे पुसावे तदितर जन सर्व मोहमयपाशीं ॥

सर्व वानरगणांची ही स्थिती पाहून वसिष्ट त्यांस ह्मणतात—

### श्लोक

आकास्मिको ध्यान विपर्य योयं । ममाप्यभूद्राघवतत्परस्य ॥
तत्कारणं यद्यपि नैव जाने । तथापिबोध्दुं प्रयते प्लवंगमाः ॥

माझ्याही ध्यानधारणेंत तुमच्या प्रमाणेंच राम स्त्रीरूप दिसतात याचे खरे कारण माझ्याही लक्षांत येत नसल्यानें आपण सर्वजण आतां प्रत्यक्ष रामदर्शनार्थ तिकडेंच जाऊं असें म्हणून सर्वजण; श्रीराम-शयनागाराकडे वळले.

### आर्या

सुग्रीव सकल वानर गुरुसह श्रीराम दर्शना निघती ।
येता भक्त तसेही जे कां पदरज क्षणोक्षणीं नमिती ॥

दरवाजापाशीं सर्व भक्तगण जमून रामाची प्रार्थना करूं लागले-

### पद [ प्रभाती० दादरा ]

जागीये रघुनाथ कुंवर पंछी बन बोले ॥ धृ० ॥
प्राचि भानु प्रगट भयो । रजनी को तिमिर गयो ।
भ्रमर करत कुंजगान । कमलदल प्रफूले ॥१॥

### साकी

गुरुकी हाक सुनि रघुनंदन पगसे दौरत आया ॥
हातमो कंकन पगमो पैंजन पीतवसन लपटाया ॥

तो रामाचा स्त्री रूपातील अपूर्व थाट पाहून सर्व जण चाकित झाले. सीता अगोदरच उठून गेली होती. तिला ही रामाची फजिती झालेली पाहून आनंद झाला. व मायेच्या नादी लागल्याने आपलीही झालेली दुर्दशा रामाच्या लक्षांत येऊन ते ओशाळले. हास्यरसांत ह्या चमत्काराची वर्णनें सर्वत्र सुरु झाली. सारांश

॥ दैवी ह्येषा गुणमयी ममभाया दुरत्यया ॥

या वचनाची साक्ष प्रत्यक्ष त्यांच्या चारित्रांतूनच पटली म्हणून—

**पद [नका करूं अविचार]**

नारायणें माया, पहा कशी नश्वर विषयीं रमवुनि
सकळा, मोह पाडुनि नेते विलया ॥धृ०॥
दृग्गोचरहि समिरण नसुनी ॥ सकळ जनासी जेंवि
चाळवुनि । क्रिया करवि तशी ही जन मोहिनी ।
पात्र करी निरया ॥१॥

या मायेच्या प्रभावी मोहांतून सुटका करून घेण्याचा अखेरचा एकच उपाय

मामेवये प्रपद्यन्ते माया मेतांतरन्तिते

**पद [ जालंअजब एक-वसंत-झपताल ]**

सांडोनि ती आस । लावी निजध्यास ।
भगवत्पदीं खास । सुखि तोचि झाला ॥१॥
धरणीवरी धन्य । तो सज्जना मान्य ।
त्या वांचुनि अन्य । ते भारभूला ॥२॥
म्हणुनि चतुर मनुज । त्यजुनि इतर काज ।
भजती रघूराज । चरणांबुजाला ॥३॥

**श्री राम जयराम जय जय राम**



# आत्मोद्धारास मृत्युलोकच श्रेष्ठ.

## अभंग

स्वर्गींचे अमर इच्छितातो देवा ।
मृत्युलोकीं द्यावा जन्म आह्मां ॥

एकदा एक धेनू अरण्यांत फिरत असतां जलपानार्थ ती नदींत उतरून गाळांत जाऊन अडकली. इतक्यांत एक महात आपल्या हत्तीवर बसून त्या रस्त्यानें जात असतां धेनूची ती दुःखदायक स्थिती

## अभंग

पंकामाजी धेनू कष्टतसे भारी । विचारी अंतरी मुक्त व्हावे ॥

पाहून महाताने हत्तीच्या सहाय्यानें धेनूस बाहेर काढून तो घरी आला. यःकश्चित दुर्बल मानव एवढया मोठ्या प्रचंड शक्तीच्या जीवाला ( हत्तीला ) आपले हुकूमी वाहन बनवून त्याजवर आपली मानवीसत्ता कशी गाजवितो याचें प्रत्यक्ष दृश्य तेथून जाणाऱ्या यमदूतांनी पाहून त्या बलवान हत्तीची त्यांस कींव आली. व त्यास गांठून ते म्हणूं लागले कीं,

## आर्या

मग ते सन्मुख येऊनि स्मित वदनें निंदिताति त्या करिला ।
तूं थोर सान मानव टोचुनि अंकुश तुला कसा धरिला ॥
तूं शक्तिवान, मानव मशक जसा तुजपुढें करी नखरा ।
मूर्ख खरा छळ सोसुनि राहसीरे वाटते करी न खरा ॥

## श्लोक

लज्जा न ते तुज उगा जगि वाढलासी ।

हें यमदूतांचे भाषण ऐकून,

## साकी

करि बोले मानव हा सागर ज्ञानधनाचा समजा ॥
इंद्रादिक वश होती याला केवि पशूची गमजा ॥

## ओवी

ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र । उदय होता तयांचा ज्ञानेंद्र ॥
हिमनगकन्या सहित रुद्र । स्वाधीन होती तयाच्या ॥

हत्ती यमदूतांस म्हणतो बाबानो! ज्ञानवानवराची योग्यता सामान्य समजूं नका.

पद ( राग-धानी, त्रिताल. रणगगनसदन )

नर विमल अमरसम गमला । जो बनला निशिदिनी प्रभुवर
पद मधुकर जनसुख हितरत, वरिकमला ॥१॥
कीट अमित दिसत भरत भुवनीं । परि कृमिसम मरणा उचित
न ज्ञानवान मनुज करी वदे यमदूताला ॥२॥

हें हत्तीचें भाषण ऐकून यमदूत त्यास म्हणतात,

## ओवी

तूं असशी मूर्खमती । मानवाची काय गती ।
तयांचे प्राण अवचिती । आह्मीं काढून आणितो ।

## अभंग

ऐकोनिया ऐसे दुतांचें भाषण । बोलतो गर्जोन गजराज ॥
व्यर्थ कासयासी मांडियेला पण । मानव सप्राण न्याल जरी ॥
सदेह न्याल जरि दाविताल हात । पाडितील दात यमाजीचे ॥
नांगीवीण विंचू विषावीण सर्प । कासियासी दर्प मांडियेला ॥

## ओवी

तव ते दूत क्रोधें म्हणती । निंदुनिया गजास बोलती
तुज मारी त्या माहुताप्रती । आतांचि नेतो सदेह

हा सर्व संवाद माहुताने स्वस्थपणें ऐकून घेतला. हत्ती व यमदूत यांच्यात ठरलेल्या पैजेप्रमाणे यमदूतांनी आपल्या अधिकाराची ओळख विसरून त्या माहुतास सदेह स्थितीत आणून यमापुढें उभे केले व आपण तेथून निघून गेले.

### ओवी

माहूत विचारी मानसी । गजोक्ती सत्य करावी कैशी ।

### कारण

प्रथम सन्मान आम्हासी । गजस्कंधी मिळाला ॥

माहुत यमाजवळ जातांच यमाने त्यांस मान दिला.

मग झाल्या दोघांच्या भेटी । यम पुसे आलांत कशासाठीं ।
महात म्हणे जगजेठी । तुम्हां वैकुंठी बोलावितो ॥

खुणेसाठीं जवळची जपमाळ दिली.

### दिंडी ( बागेश्री )

सत्य मानुनिया वचन माहुताचें । चित्रगुप्ता सांगतो धर्मशाचें ।
वैकुंठासि जाऊनि येऊं आतां । तव मानावी भक्तराज सत्ता ॥

### ओवी

निघता झाला वैवस्वत ? निजासनी बैसविला माहुत ।
चित्रगुप्तासी म्हणे त्वरित । आणा दप्तर आपुलें ॥

दप्तर तपासणी झाल्यानंतर तेथील प्राक्कर्मविपाकन्यायानुसार मृत्युलोकाहून आणिलेल्या कैद्यांची तपासणी करण्याकरितां ही स्वारी चित्रगुप्तासह बाहेर पडली.

### ओवी

सवें घेऊन चित्रगुप्त । नरककुंडे पाहिलीं समस्त ।
तप्तास्त्र यातना अमित । भोगिता प्राणी पाहिले ॥

त्या यातनेतून सोडविण्याकरितां कित्येक प्रभूचा धांवा करितात.

### पद [ बागेश्री ताळ झंपा ]

धांवरे धांव आणि पतितजन पावना । अंत आमुचा किती
बघसि करुणा घना ॥धृ०॥

दनुज व्रज कंदना । अमरगण वंदना । मोह तिमिरारुणा ।
पात्र जगज्जीवना ॥१॥

मदनशत सुंदरा । नच आह्मां आसरा । तुजविणे माधरा ।
सुरनिकर भूषणा ॥२॥

याप्रमाणें त्यांची ती दैन्यावस्था पाहून,

**आर्या**

होऊनि सदय म्हणेरे सोडावे यातना न सोसवती ।
भंग मदाज्ञा न करा मद्विषयीं भावना नसो सवती ॥

स्वल्पकाळ प्राप्तसत्तेचा सदुपयोग करुन महाताने त्या सर्वांची सुटका करितांच पूर्वीच्या यमाऐवजी हा कोणी नवा सद्बुद्धीचा यमधर्म नेमण्यांत आला आहे असे समजून सर्वांनी त्याला अनेक शुभाशिर्वाद दिले, व सर्वजण नामस्मरण करीत वैकुंठाकडे चालले.

**॥ श्रीकृष्ण गोविंद हरेमुरारे ॥**

**॥ हे नाथ नारायण वासुदेव ॥**

**ओवी**

इकडे यम आले वैकुंठासी । नमूनी महाविष्णुसी ।
म्हणे किमर्थ दासासी । पाचारिले स्वामी या ॥

विष्णु म्हणतात मी कधीं बोलाविलें. इतक्यांत नारदाची स्वारी नामस्मरण करीत तेथें आली.

**पद ( राधाधर—धुमाळी )**

पुरुषोत्तम जयराम । जयजय । पूर्णकाम सुखधाम ॥धृ०॥
ह्याचे लागो छंद निरंतर । वसत सदा मुखी नाम ॥१॥
वमनासम जो वैभव मानी । विषयीं लव नच काम ॥२॥

विष्णुनीं कांहीं चमत्कार पाहिला काय असे नारदास विचारतांच नारद सांगतात,

**ओवी**

यमपूर केवळ न्यायालय । न्यायासनी सदय हृदय ।
परी ते सेवक कुटिल निर्दय । सशरीर वर आणिला ।

## अभंग


तया मानवाने केले ऐसे ढोंग । धाडिले सवेग यमालागी ॥
नरकामाजी जीव होते ते समस्त । करुनिया मुक्त पाठवीले ॥

इतक्यांत ते सर्व जीव नामगजर करीत तेथें आले. नंतर विष्णुदूतांनीं माहुतास तेथें आणितांच त्यानी यमदूतांची मानवी प्राण्याविषयीं तिरस्कारता दाखवून त्यांचा गैरसमज घालविण्याकरितां मला हे धाडस करावे लागलें. शेवटी स्वर्ग, पाताळादि अन्य लोकांपेक्षां आत्मोद्धारास मृत्युलोकच किती श्रेष्ठ आहे हे स्वानुभाविक दृष्टांताने व

स्वर्गीचे अमर इच्छिताती देवा । मृत्युलोकी द्यावा जन्म आह्मां ।

या संतांच्या अभंगवाणीनें सिद्ध करून देतांच त्याच्या गजराजासह विष्णुनी त्याचा उद्धार केला.

———



॥ श्री ॥

# पंण्डित जगन्नाथराय

## अर्थात्

# यवन--वधू--उद्धार.

[ गोभक्त महादेवबुवा खळदकरकृत ]

## पूर्वरंग

॥ श्रीमन्महा गणाधिपतयेनमः । श्री सरस्वत्यैनमः ॥

या कुन्देदु तुषारहार धवला या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणावरदण्ड मण्डितकरा या श्वेतपद्मासना ।
या ब्रह्माच्युतशंकर प्रभृतिभिर्देवैः सदा वंदिता ।
सा मां पातु सरस्वति भगवती निःशेष्यजाड्यापहा ॥
गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुःसाक्षात्परब्रम्ह तस्मै श्रीगुरवेनमः ॥

## अभंग

पुनीत केलें विष्णुदासी । संगे आपुलिया दोषी ॥१॥
कोण पाहे तयाकडे । वीर विठ्ठलाचे गाढे ॥२॥
अशुभ त्या पुढें । शुभ होऊनिया ठाके ॥३॥
प्रेमसुखाचिया राशी । पाप नाहीं ओखदासी ॥४॥
तुका म्हणे त्यांनीं । केली वैकुंठ मेदिनी ॥५॥

---

पुनीत केलें विष्णुदासीं । संगे आपुलिया दोषी

भगवत्भक्त विष्णुदास आपल्या संगतीनें पतितांचा उद्धार करितात ही गोष्ट खरी; पण त्यांना तितका आधिकार केव्हां व कशाने प्राप्त होतो अर्थात विष्णुदास कोणाला म्हणावे हें प्रथम समजलें पाहिजे.

उचीत जाणावे मुख्य धर्म आधी । चित्तशुद्ध बुद्धी ठायी स्थीर॥

ही विष्णुदासांची प्राथमिक लक्षणें तुकाराम महाराजांनी स्वानुभवानें सांगितलीं आहेत. मुख्य धर्माची आत्यंतिक जाणीव प्रथम अवश्य बाळगून जो कर्म, विकर्म आणि अकर्म म्हणजे काय हे यथार्थ जाणितो तो विष्णुदास. आतां कर्म म्हणजे काय?

**ज्ञानेश्वर**

**तरी कर्म म्हणजे स्वभावें। जेणें विश्वाकार संभवे॥**
**तें सम्यक आधीं जाणावें। लागे येथ॥**

कर्म म्हणजे ज्या योगें जगाचा सर्व व्यवहार सुरळित चालतो ती क्रिया आणि विकर्म म्हणजे अंगिकृत कार्यासाठीं जें विशेष कर्म करावें लागतें तें,

**मग वर्णाश्रमासि उचित। जें विशेष कर्म विहित।**
**तेंही ओळखावें निश्चित। उपयोगेसी॥**

आणि अकर्म ?

**पाठीं जे निषिद्ध म्हणिपे। तेंही बुझावें स्वरुपें॥**

या प्रमाणें सर्व साधारणपणें काय करावें, वर्णाश्रमाप्रमाणें विशेष काय करावें आणि काय करूं नये हें विष्णूदासास प्रथम समजलें पाहिजे.

**अथातोऽधर्म जिज्ञासा**

या पूर्व मिमांसेतील वाक्याचा

**उचीत जाणावे मुख्य धर्म आधीं**

हा तुकारामांनी केलेला अनुवाद आहे. आधीं म्हणजे विद्यासंपन्न झाल्यावर, अथवा हिताहित कळूं लागल्यावर, अथवा अमुक एक धंदा करावयाचा हें ठरल्यावर, निदान हा अभंग कानीं पडल्यावर मुख्य म्हणजे सर्व मनुष्यांना सर्व वर्णांना, आश्रमांना साधारण असे, अथवा ज्यावर बाकीचे धर्म, बाकीचीं कर्तव्यें बरीं वाईट होणें सर्वस्वी अवलंबून आहे असे धर्म जाणावे, समजून घ्यावे, हें योग्य आहे. पण धर्म म्हणजे काय?

**चोदनालक्षणोऽर्थो धर्मः**

चोदना लक्षणं यस्य चोदना लक्षणः। चोदना प्रवर्तकः शद्वः लक्ष्यते ज्ञायते अनेन इतिलक्षणम् ज्ञानसाधनम्।

अर्थ :- सुखादिक दुःख अजनकी भूतः पदार्थः । स एवधर्मः ज्या गोष्टीचें ज्ञान विधी ( अमुक गोष्ट कर अशा प्रकारच्या ) वाक्यावरून होते, आणि ज्या गोष्टीपासून प्राप्त होणाऱ्या सुखापेक्षा अधिक दुःख होत नाहीं त्याला धर्म म्हणतात. या धर्म शद्बाची व्याख्या आद्य शंकराचार्यांनीं केली आहे ती अशीः—

**द्विविधो हि वेदोक्तधर्मः । प्रवृत्तिलक्षणो निवृत्ति लक्षणश्च ।**

वेदामध्यें सांगितलेला धर्म दोन प्रकारचा आहे. एकानें कांहीं गोष्टी करा म्हणून सांगितलें आणि दुसऱ्यानें 'अमुक करूं नका' म्हणून सांगितलें आहे परंतु धर्माचें मुख्य लक्षण असें आहेः—

**जगतः स्थितिकारणं प्राणिनां साक्षादभ्युदय—**

**—निश्रेयसहेतुर्यः स धर्मः**

सर्व जगाची स्थिती अथवा एकंदर व्यवस्था उत्तम चालण्यास जो कारणीभूत होतो. आणि सर्व प्राणिमात्रांच्या प्रत्यक्ष अभ्युदयाला म्हणजे ऐहिक सर्व सुखसोयीला आणि वैभवाला जो कारणीभूत होतो त्याचप्रमाणें पारमार्थिक मोक्ष मिळावा हाही ज्याचा हेतु अथवा उद्देश असतो त्यालाच धर्म म्हणावें.

**धर्मोविश्वस्य जगतः प्रतिष्ठा**

**अथवा**

**सर्वं खल्विदं ब्रम्ह**

हीं तत्त्वें याच प्रकारच्या धर्मांत सांठविली आहेत म्हणून या ऐहिक वा पारलैकिक किंवा प्रवृत्तिपर अथवा निवृत्तिपर यथार्थ धर्माची जाणीव ज्यानें प्रथम करुन घेऊन नंतर जो त्यांतूनच पद्धतशीर भगवत्कृपा संपादन करितो तोच खरा विष्णुदास होय. व्यावहारिक धर्मातील 'स्वातंत्र्य काय किंवा पारमार्थिक धर्मातील मोक्ष काय, त्यालाच मिळतो.

**पद ( आपला आपण वैरी )**

निजधर्मीं रत झाला । लाभे खचितची मोक्ष तयाला ॥धृ०॥
ज्या पासुनि ही भूतें झालीं । व्यापी जो जगताला । अनन्यभावें
निजकर्माच्या द्वारें पुजुनी त्याला ॥१॥

अशाच प्रकारच्या अधिकारी जीवास आपल्या सहवासाच्या योगानें पातकी अथवा पतित जनांचा उद्धार करण्याचें सामर्थ्य प्राप्त होत असते आणि म्हणूनच 'पुनीत केलें विष्णुदासीं । संगे आपुलिया दोषीं' हे अधिकार वाणीने तुकाराम बोवांनीं जगास सांगितलें :-

गंगापापं शशीतापं दैन्यं कल्पतरुस्तथा ।
पापं तापंच दैन्यंच हंतिसंतो महाशयाः ॥

गंगा, चंद्र आणि कल्पतरु यांच्यांत अनुक्रमें पाप, ताप आणि दैन्य ह्या एकेकाचाच नाश करण्याचें सामर्थ्य आहे. पण आमच्या विष्णुदासांत :-

पापताप दैन्य जाय उठाउठीं । जाहलिया भेटी वैष्णवाची ॥
ऐसें बळ नाहीं आणिकाचें आंगीं । तपतीर्थे जगीं दानें व्रतें ॥
चरणीचे रज वंदी शूळपाणी । नाचती कीर्तनी प्रेमभावें ॥
भव उतराया उत्तम हो नांव । भिजोनेदि पाव हात कांहीं ॥
तुकाह्मणे मन झालें समाधान । देखिल्या चरण वैष्णवांचें ॥

तपश्चर्या, तीर्थाटणें, मोठमोठीं दानें, चांद्रायणादि व्रतें, यांच्याही पेक्षां सद्भक्तांच्या सहवासाचें माहात्म्य अधिक आहे. त्यांचा सहवास झाला कीं त्रिविधताप नाहींसे होतात, पातक करण्याची वासनाच नष्ट होते. आपण दीन आहोंत ही कल्पनाच मनांत येत नाहीं.

कदाचित् पतीतजन येथें अशी शंका घेतील कीं अहो आमच्या संगतीनें सद्भक्ताला नाहिकां दोष लागणार ?

सुभाषितकार लिहितात 'नाहीं'

विकृतिर्नैव गच्छंति संग दोषेण साधवः ।
आवेष्टितं महासर्पैश्चंदनं न विषायते ॥

संगतीच्या दोषानें सत्पुरुषाच्या साधुत्वांत विकार होणेच नाहीं. मोठमोठ्या सर्पांनी वेष्टित चंदनवृक्ष विषारी होतात काय ?

उलट भगवान सांगतात.

पद

जरि मद्भक्त दुराचारी । तरि तो संताचि अवधारी ॥

श्रीहरी भक्तियोगे खचितचि मुक्ति होईल मजला ।

ऐसा अंतरी तप्त होऊनि निश्चय ज्यानें केला ॥१॥

चंदन बाभुळ खैर असा हा भेद तोंवरी पाहीं ।

तींच लाकडे अग्नीमाजी जोवरी पडली नाहीं ॥२॥

इश्वराचा भक्त आणि तो दुराचारी कसा राहील !

सद्भक्तांचा महिमाच असा आहे कीं ज्याला त्यांचा समागम होईल त्याला ते आपल्या सारखाच करुन टाकितात मग तो भक्त प्रवृत्ती मार्गांतला कां असेना.

आपणा सारिखे करिती तात्काळ

छत्रपती शिवाजी महाराजांनीं स्वतंत्र हिंदुपद बादशाही स्थापन करण्याची पूर्व तयारी चालविली होती त्यावेळीं फलटणास निंबाळकरांच्या घराण्यांत.

शा० वि०

होता एक कुलीन शूर सुगुणी राजा मुधोजीस त्या ।

भार्या दोन सुपुत्रवंत नडते सापत्नता जाणत्या ॥

होता नित्य उदंडतंड पहिली दारा सुता घेऊनीं ।

गेली सोडुनिया रडे सवतिला शापी मुला वाहुनी ॥

पहिल्या स्त्रीने दोन मुलांसह जे एकदां घर सोडलें तें सोडलें. नंतर

उपजाती

साबाजि आणि जगदेव दोघे । विजापुरी येऊनि मायसंगे ॥

सेवा करोनी समर प्रसंगे । शहा तुष्टवीती निजशौर्य योगें ॥

आपल्या पराक्रमानें त्यांनीं पांच हजार सैन्यावरील सरदारी मिळविली. आपल्यास घरांतून बाहेर घालविल्याबद्दल बापाचा आणि सावत्र भावाचा सूड उगविण्यांस ही संधी बरी आहे असा विचार करून साबाजीनें 'शिवाजीचे बंडास आपलें वडील अनुकूल आहेत' असें बादशहास कळविलें तेव्हां बादशहानें बजाजीला कैद करून आणण्याची कामगिरी साबाजी आणि जगदेव यांचेचकडे सोंपविली. मुलानी फलटणावर स्वारी करून आपल्या बापास कैद केलें व विजापूर दरबारांत त्यास बादशापुढें उभे करितांच

### स्रग्धरा

बांधोनी त्यासि नेलें यवपनतिपुढें जेधवा आत्मजांनीं ।
तेजेंरूपें गमे तो अतुल बल जसा भीम कीं देव कोणी ॥
दाटी मार्गीं बघाया सुजन वदति या कोंवि शोभेल बेडी ।
बाला त्या बादशहाची सुतनुनववया पाहुनी होय वेडी ॥

बजाजीस पुढें उभा करून साबाजीने लढाईची हकिगत सांगतांच

राजद्रोही दुरात्मा हुकुम न दुसरा ठार याते करावा ।
ऐसें क्रोधें वदे तो यवनपति तदा क्रोध हा आवरावा ॥
माने शिर्के शितोळे विनवुनि ह्मणती कीं क्षमा एकवेळा ।
व्हावी याते असावें पदरिं आपुलिया लोक हे रत्नपाळा ॥

बादशहा म्हणाला

सकळ तुह्मी मराठे हा असें जातभाई ।
ह्मणवुनि गळ ऐशी जाणतो सर्व मीही ॥
न करिन वध याचा धर्म इस्लाम घेतां ।
रुचत जरि तयाचे होऊंदे मान्य आतां ॥

बोल बजाजी आह्मी आज्ञा केली ती मान्य आहेना. होतोस कां मुसलमान

बजाजी—

### पंचचामर

असें सुजाण वीर मी नव्हें बिडाल श्वान हो ।
करील भ्रष्ट जाति तो खरा न आर्य वंश हो ॥
नसे अम्हांसि प्राणही अधीक धर्म सोडुनी ।
सुकीर्ति आपुला सुधर्म राखुनीच ये जनीं ॥

बादशहाचा जुलूम होत असलेला पाहून शेवटीं बजाजी—

## साकी

श्रेष्ठ सनातन धर्म टाकुनी भ्रष्टपणा जो करितो ।
जाण सोडुनी मधुघृत पायस सूकर विष्ठा खातो ॥
त्याहुनि मृत्यु बरा ॥ देई स्वर्गी तोष पितरा ॥

मुसलमानीं दरबारांत हें भलतेंच शद्ब ऐकून सर्व लोकांचें अंगावर काटा उभा राहिला. बादशहा तर रागाने बेहोष होऊन त्यानें अखेरचा हुकूम फर्माविला—

## पद ( शंकराभरण–झंपा )

सभा ऐकतां शद्ब हें स्तब्ध झालीं ।
जणो रक्तनेत्रीं नृपाच्या निमाली ॥धृ०॥
ठार या क्षणिं करा, तप्तशस्त्रीं चिरा ।
यासी ज्वाळा करा राख होळी ॥ १ ॥
क्रुद्ध नृप बोलिला, दूतगण धांवला ।
खेंचुनि पाडिला वीर खालीं ॥२॥

बजाजीला खालीं पाडल्याबरोबर बादशहाच्या सिंहासनाच्या मागील चिकाच्या पडद्यांतून एक किंकाळी ऐकूं आली. व कोणी धाडकन पडल्याचाही भास झाला.

उठलि तव आरोळी स्त्रीजनी कोण भ्याली ।
अनुचर वर खाली धांवती हाक झाली ॥

शेवटीं बजाजीचें प्रत्यक्ष मरण टळून त्याचें नशिबी बंदीवास आला.

प्रियजन पडलासे बद्ध कारागृहीं ते
बघुनि यवनि कष्टी सौख्य योजी तयाते ॥
बहुपरि करि युक्ति गुप्त भेटीस आली ।
त्यजुनि विनय सारा एकटी आंत गेली ॥

आंत जातांच तिनें आपल्या मुखावरील बुरखा बाजूस करून ती बजाजीपुढें उभी राहिली. तिचें तें अप्रतिम सौंदर्य, मनोहर गौरकांती, व

बहुमोल अलंकारानी सजविलेली अशी ती सुरम्य मूर्ती पाहून बजाजी चकितच झाला. आपण कोण ह्मणून विचारितांच मी शहाजादी असें तिनें उत्तर देऊन

### पृथ्वी

नसाचि परकी मला वरियलें मनें मी जरी ।
कुलीनपण राखणें स्वसतीचें पतीच्या करीं ॥
म्हणाचि मज आपुली गृहिणि जो असे दोष तो ।
नका मजवरी धरूं यवन जातिचा रोष तो ॥

बजाजी ह्मणाला—

### शा० वि०

जात्या तूं यवनी तुला वरिन मी सांगे मराठा कसा ।
धर्मासी त्यजुनी नको सुख मला तूं हट्ट सोडी असा ॥
जा कोणी वर जा सुरूप तरणा त्वज्जातिचा नोवरा ।
व्हाया सौख्य जगीं अभागि पति मी नोहे तुलागे बरा ॥

शहाजादी ह्मणत्ये:— काय हा तुमचा वेडेपणा. या बंदिशाळेतील तुमची कष्टमय स्थिती नष्ट व्हावी असें तुह्मांस वाटत नाहीं काय?

बजाजी—

### दिंडी [ बागेश्री ]

मानितो मी प्रासाद बंदिशाला । शृंखलांच्या गुंफिल्या पुष्पमाला ॥
चिता सिंहासन शूळ राजदंड । मृत्युदैवत दे अमरता उदंड ॥

हें निर्वाणीचें भाषण ऐकून मात्र शहाजादीचा धीर सुटला. शहाजादीनें चिकाच्या पडद्यांतून मी दरबारांत आपणांस कसें पाहिलें, माझ्या ओरडण्यानें तेथील आपला मृत्यु कसा टळला वगैरे सर्व हकीगत सांगून शेवटीं मुक्तकंठाने रुदन करीत तिनें आपलें मस्तक बजाजीच्या पायावर ठेऊन म्हणाली—

### पद ( मालकंस, त्रिवट )

दया करा मजवरती आतां । अबलेचा कां अंत पाहतां ॥धृ०॥
मान्य असो जनकाची बोली । पाळुनि राहू हिंदु चाली ॥
वचनाधावें मज या काळीं । जीव न ठेविन नाहीं ह्मणतां ॥१॥

अशा प्रकारच्या तिच्या निरपेक्ष शुद्ध प्रेमानें बजाजीच्या दृढ निश्चयाचें पाणी झालें. हिला नकार द्यावा तर आतांच होणाऱ्या हिच्या हत्येनें आणखी आपल्यावर काय काय संकटें ओढवतील याचा नेम नाहीं. सारांश एकीकडे स्वधर्मपालन, तर दुसरीकडे स्त्रीहत्या अशा स्थितीचा त्यानें सारासार विचार करून शेवटीं स्त्रीहत्येपेक्षां इच्याशी लग्न करावें हेंच कमी पातक समजून त्यानें मायेनें शहाजादीच्या अंगावरून हात फिरवून तिला उठविलें.

वजाजीनें आपला अंगिकार केला हें पाहून तिला फारच आनंद झाला व हा योग मी आपल्या पित्याकडून घडवून आणीन असें सांगून ती निघून गेली.

इकडे मराठे सरदार 'मुसलमानी धर्म स्वीकारून कां होईना पण आपला प्राण वांचीव' असा आग्रह वजाजीस करूं लागले आणि शेवटीं आपल्या मुलीकडून

### शा० वि०

आहे मान्य असें शहासि कळतां केली त्वरें मुक्तता ।
प्रेमाचे परि ती बजाजिस घडे बंदी नये त्यागितां ॥
झालें लग्न मिळे तयासि पदही मोठें तरी वाटतें ।
कीं हा विक्रय जातिधर्म तनुचा केला मनीं डाचते ॥

योगायोग असा कीं कांहीं काल त्या शहाजादीच्या सहवासांत आनंदाचा गेला पण पुढें तीही कालवश झाली तेव्हां ही स्वारी स्वदेशी (फलटणास) येण्यासाठीं निघाली असतां मध्यंतरी लागलेल्या शिंगणापूर येथील एका पवित्र शिवालयांत दर्शनार्थ प्रवेश करणार तोंच तेथील पुजारी त्यांस ओळखून म्हणाला—

### उपेंद्रवज्रा

श्रीशंभु वंदावया आंत जाई । जा जातिभ्रष्टा तुला मार्ग नाहीं ॥
द्वारी पुजारी आडवोनि बोलें । मृत्यूहुनी त्या अति दुःख झालें ॥

बजाजी महाद्वारा बाहेरूनच शंकराची प्रार्थना करूं लागला.

### पद ( असावरी–त्रिवट )

दृष्टीस पद ना पडतें । देवा । पातक मजतें गमतें नडतें ॥धृ०॥
चित्त सर्वथा तवपदिं रमतें । अनुतापें मन तापुनि कढतें ।
अझुनि न वळतें । करुणा घनतें ॥

श्री शिवाजी महाराजांचा मुक्काम मातुश्रीसह शिंगणापुरीं आपल्या वाड्यांत आहे असें त्यास समजलें. वर्दी लावून तो त्यांच्या दर्शनास गेला. मातोश्री जिजाबाईसाहेब यांच्या आणि शिवाजी महाराजांच्या पायांवर मस्तक ठेवून डोळ्यास पाणी आणून त्यानें आपली सर्व हकिगत सांगितली व म्हणाला—

### पद [ प्रेमसेवा–झपताल ]

दीन पायीं शरण, हरण दुरिता करा ।
स्वजनीं घ्या, मज करूनी पुनित करुणा करा ॥धृ०॥
मज तुच्छ करितात । सुख नाहीं जगतांत ।
शिवकीर्ति जन गात । पतित हा उद्धरा ॥१॥

बरें पाहू, असें म्हणून उभयतांनीं त्यास ठेवून घेतलें. सर्व विप्रवृंदांची सभा भरविली. बजाजीनें सभेंत आपली सर्व हकिगत सांगितली सभेतील, विप्रवृंदानी सर्व धर्मग्रंथ पाहून सांगितलें—

### शा० वि०

झालें पातक या अघोर नचतो शास्त्रार्थ कांहीं दिसे ।
नाहीं एकहि वाक्य पूर्व ऋषिचें होईल आधारसे ॥

तथापि देशपरिस्थिती व कालवर्तमान पाहून तदानुरोधाने बजाजीला प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घेण्यास धर्मशास्त्रें सर्वस्वी आड येतात असें मात्र कोणी

समजूं नये. धर्मशास्त्राच्या निर्माणकाली चातुर्वर्ण्याची इतकी अधोगती झाली नसल्याने त्या संबंधांतील निर्णय त्यांत सांपडणे केव्हांही शक्य नाही, म्हणून या वेळी आमचे आपणांस इतकेंच सांगणें आहे कीं :—

अशा या कालीं हो सकल आपुली ज्ञाति भरवा।
जसें ध्यानीं येई सुमत आमुचें तेंचि ठरवा॥

मग काय?

## भुजंगप्रयात

मराठे मिळाले कुळे थोर जी जी।
बजाजीसवे जेविती पंक्तिमाजी॥

या प्रमाणे बजाजीस देशकालवर्तमानानुरुप योग्य प्रायश्चित्त देऊन शेवटी

तयाच्या सुताला शिवापुत्रि देतो।
करी पूर्ण जे जे जगीं थोर तें तो॥

सारांश स्वकर्म स्वार्थत्यागपूर्वक यथासांग करून त्यांतून परकरगत महीधर्माचा उद्धार करू पाहणाऱ्या शिवबा सारख्यां विष्णुदासाकडे दोषैक्य दृष्टीनें कोण पाहू शकेल बरे?

कोण पाहे तयाकडे। वीर विठ्ठलाचे गाढे॥

आतांपर्यंत पूर्वोक्त अभंगांतील प्रवृत्तीपर विषयांचे निरूपण होऊन प्रवृत्तींत नटलेल्या व तद्वारा निवृत्तीकडे वळण्याची तयारी चालू असलेल्या शिवरायाच्या चारित्र्यांतील अनुपम दृष्टांतानें त्याचें यथामती वर्णन झाले. आतां त्याच अभंगांतलि उत्तरार्धांत दिलेल्या निवृत्तीपर विषयाकडे वळू.

यस्यसर्वे समारंभा कामसंकल्प वर्जिताः
ज्ञानाग्नि दग्ध कर्माणं तमाहुः पंडितं बुधाः

ज्याची सर्व कृत्यें निर्हेतुक असतात त्यालाच शहाणे लोक 'ज्ञानाग्नि दग्धकर्मा पंडित' असें म्हणतात. श्री. आद्यशंकराचार्य, पंडित जगन्नाथराय, श्री ज्ञानेश्वर, एकनाथ, समर्थ रामदास, संत तुकाराम इत्यादि आत्मसाक्षात्कारी हे ज्ञानाग्नि दग्ध पंडीतच होत.

ज्ञानाग्निदग्ध कर्मा म्हणजे ज्यांनी आपला कर्मविपाक ज्ञानरूप अग्नीनें जाळून टाकिला आहे तो

निराशीर्यतचित्तात्मा त्यक्त सर्व परिग्रहः ।
शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥

जो आशेचा नाश करून, चित्त आणि आत्मा यांचे दमन करून सर्व परिग्रहांचा त्याग करितो त्याला पाप लागत नाही म्हणून

अशुभ त्यापुढें । शुभ होवोनियां ठाके ॥


पैठणांत नाथांच्या अंगावर चुळा व तांबुलाची पिचकारी टाकून शेवटीं नाथांच्या दिव्य प्रभावापुढें त्याच्या अशुभ कर्माचा पाडाव होऊन तो उलट नाथ शिष्य कसा बनला ही गोष्ट आपणां सर्वांस विदितच आहे. ज्या अंतःकरणांत सर्व भूतमात्राच्या सुखाचीच केवळ कल्पना आहे, सर्व जगांवर एक सारखे प्रेम करावे ही ज्याची एक दिव्य भावना आहे, तेथे पाप येईल कोठून ?

प्रेम सुखाचिया राशी । पाप नाहीं ओखदासी ॥

अशा प्रकारचे जे निवृत्तिपर सिद्ध पुरुष तेच जगताचे खरे खरे उद्धारक वसुधैव कुटूंबकम् ते हेच. आपल्या सत्कर्मानें पतीत व पातकी जनांस चांगला मार्ग दाखवून त्यांचा उद्धार करितात आणि आपल्या आंगच्या दिव्य प्रभावानें प्रवाहपतीत अशा सामान्य जनतेस अद्भूत दैवि-चमत्कार तेहि केवळ लोकसंग्रहार्थ दाखवून या मृत्युलोकाचाच प्रत्यक्ष वैकुंठ बनवितात म्हणून अभंगाच्या शेवटीं,

तुकाह्मणे त्यांनीं । केली वैकुंठ मेदिनी ॥

———



श्री राम मामुद्धर

कर्मयोगी

# पण्डित जगन्नाथराय

अर्थात्

# यवन--वधू--उद्धार.

## आख्यान.

लोककल्याण करण्याची वासना राहिली, जगदोद्धार करण्याची इच्छा तृप्त झाली नाहीं म्हणजे कर्मयोगी पुरुषाला इश्वरीन्यायानुसार पुन्हां जन्म घ्यावा लागतो.

प्राप्य पुण्यकृताँल्लोकनुषित्वा शाश्वतीः समाः ।
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ।।

ज्याचा योग अपुरा राहिला, तो पुण्यवान लोक ज्यालोकाप्रत जातात त्यालोकीं जाऊन ठराविक कालपर्यंत तेथें राहून नंतर अर्धवट राहिलेली भूलोकावरील आपली कामगिरी पूर्ण करण्याच्या भरपूर तयारीनें पवित्र अशा श्रीमान् घराण्यांत पुन्हां जन्म घेतो हे छत्रपती शिवरायांच्या अल्पशा चरित्र-भागानें पूर्वरंगांतून आपणांपुढें ठेविलें आहेच. हा झाला प्रवृत्तिपर कर्म-योग्याचा दृष्टांत. आतां निवृत्तीपर कर्मयोगी :—

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ।।

बुद्धिमान योग्याच्या कुलांमध्यें उत्पन्न होतो. पण या जगांत असले जन्म घेणारे कर्मयोगी फार क्वचित अवतरतात.

श्री आद्य शंकराचार्यानंतर त्यांच्या खालोखाल जगदुद्धार करणारे पंडित जगन्नाथराय हे ही याच प्रकारचे निवृत्तिपर कर्मयोगी श्री शैलपर्वताच्या पश्चिम भगांतील आंध्रप्रांतात वेंगिनाडी या तालुक्यांतील मुंगुंडा गांवीं शके-१४७२ च्या (इ० स० १५३० चा आगष्ट) श्रावण मासांत जन्मले यांच्या वडिलांचे नांव पेरमभट्ट. (दे० ऋग्वेदी) गोत्र कौंडिण्य, व मातेचें

नांव लक्ष्मिबाई, वडिलांकडून योग्यप्रकारें विद्यादान मिळतांच यांचा बालपणीच विशेष लौकिक वाढून लग्नही मोठ्या थाटांत झालें. अशा स्थितींत संसारसुखाचा उपभोग घेत असतां क्षयरोगानें त्यांची पत्नी ( भामिनी) कालवश झाली. कर्मयोग्याला त्याच्या उद्दीष्ट कार्यास चालना देण्यासाठीं असे योग यावेंच लागतात. पत्नी निवर्ततांच पंडितांनी आपल्या एकुलत्या एक मुलास ( विनायकास ) आईबापांचे स्वाधीन करून ते जयपूर येथील राजा भगवानदास याचे आश्रयास येऊन राहिलें त्यावेळीं

**होता नृपति अकबर राज्य करी दिल्लि शहरिं विख्यात ।**
**काजी एक तयाच्या पदरिं असे संस्कृतज्ञ धर्मरत ॥**

अकबर बादशहाला सर्व धर्मांची तत्वें समजून घेण्याचा फार नाद असल्यानें त्यानें अनेक धर्मांतील कित्येक नामांकित पंडित आपल्या पदरीं बाळगिलें होते. त्यापैकींच हा एक काजीही पूर्ण संस्कृतज्ञ असल्यानें हिंदुधर्माचें खंडन व इस्लामी धर्माचें मंडन करून आपली प्रतिष्ठा वाढवावी अशी यांस महत्वाकांक्षा उत्पन्न झाली. त्यानें हिंदुधर्माची बरीच तत्वें चांगली समजून घेतलीं होतीं. तशांत अकबर बादशहाच्या सार्वभौम सत्तेचा आश्रयही त्यास मिळाल्यानें संधी साधून आपल्या वादविवादाच्या कार्याकडे बादशहाचें मन वळविण्याचा त्यानें यत्न चालविला.

**नृपा काजि प्रार्थी अती नम्रभावें । महत्कार्य होईल हें त्वत्प्रभावें॥**
**मला वाटते वाद शास्त्रीजनांसी । करोनी जगीं मेळवावे यशासी ॥**

शेवटीं काजीनें बादशहाकडून एक जाहीरनामा प्रसिद्ध करविला.

**नृपति कळवी साऱ्या क्षेत्रवासी जनांसी ।**

हिंदुधर्म हा अनादिसिद्ध नसून तो मुसलमानी धर्मानंतरचा आहे हें सिद्ध करून देण्याचा

**कठिण पण करी हा काजी जिंका तयासी ॥**

या जाहीरनाम्याचा प्रसार हां हां म्हणता सर्वत्र होऊन भारतवर्षीय सर्व आर्यजनता मोठ्या संकटांत पडली.

## पद ( गर्भा—स्वर्गसोपन )

धर्म होणार हा नष्ट आपुला । रक्षणा नाहि जरि हिंदुनो
धांवला ॥धृ०॥ काजी प्रवर्ते वादी प्रतिकार जरि न होय ।
रौरव नरकीं जाल हो । जरि न कराल उपाय । या लोकीं-
विफल जन्म घेतला ॥१॥

त्यावेळीं जयपुरचा राजा भगवानदास याचें पदरी असलेल्या पंडित जगन्नाथराय यांच्या विद्वत्तेची कीर्ती सर्वत्र पसरल्यानें त्यांच्याच अध्यक्षतेखालीं भारतवर्षीय शास्त्री-पंडितांची एक मोठी सभा भरून दिल्ली येथें होणाऱ्या वादविवादांत भाग घेण्यासाठीं त्यांना मुख्य प्रतिनिधी नेमिलें. वादविवादास सहा महिन्यांचा अवधी होता. तितक्यांत पंडित जगन्नाथ यांनी आपणांस येत असलेल्या उर्दु भाषेचा फायदा घेण्यासाठीं फकीर वेषांत ते दिल्लीस येऊन त्यांनीं त्या काजीचा स्नेह संपादिला व त्यास कळूं न देतां मोठ्या चातुर्यानें त्याजकडून कुराणद्वारा आपणांस हवी ती इस्लामी धर्मांची तत्वें चांगली समजावून घेऊन पंडित जयपूरला आले .

इकडे बादशहानें हजारो रुपये खर्च करून :—

सभास्थान विस्तीर्ण निर्माण केलें ।
अनेका प्रकारें बहू शोभविलें ॥

ठरलेल्या संकेताप्रमाणें पंडितादि सर्व विद्वज्जन येऊन त्या सभेंत दाखल होतांच :—

जगन्नाथ उच्चासनी सव्य भागीं ।
तसा काजि वामांगि तो त्या प्रसंगीं ॥

पंडितांच्या बाजूला सर्व हिंदू समाज , मध्यभागी अकबर व काजीच्या बाजूला सर्व इस्लामी समाज या प्रमाणें सभा थाटली .

## आर्या

तेव्हां सभेंत काजी आरंभी पूर्वपक्ष तो ज्ञानी ।
घेऊनि राजाज्ञा ती ज्ञातीचा श्रेष्ठ पूर्ण अभिमानी ॥

काजीनें प्रथम इस्लामी धर्मांतील ' अल्लाह ' या महावाक्याचें विवरण करून त्यांतील चार वर्णांनें ईश्वरत्वाची व्याख्या सिद्ध करुन दाखविली.

प्रतिपक्षी जगन्नाथरायांनीही ' ॐकार ' या शब्दांत अकार, उकार, मकार व अंती करण रूप माला असल्याचें :—

## श्लोक

चतस्त्र तन्मात्रास्युः रकारो कारको तथा ।
मकारश्चावसानेर्ध मात्रेपि परि कीर्तीतः ॥

या शिवगितेतील श्लोकाधारे सिद्ध करून देऊन त्यांतील इश्वरत्वही सिद्ध करून दाखविलें.

काजीने इस्लामी धर्मांतील समता व निर्वैरवृत्ती दाखविण्यासाठीं :—

## गज्जल

नही दुनिया इलाही है दिलोमें ख्याल करलेना ।
शरारत ना किसे कर तूं सबीको एक जगह जाना॥
महंमद मुस्तफा सल्ले अल्लाको जिस्ने पहचाना ।
वोही जिंदा वही अदमी खुदाको होजो दीवाना ॥

हा मुद्दा पुढें आणिला. काजींचा हा अद्वैत वेदांत ऐकून पंडितांना हंसूच आले. आपल्याच जातभाईनीं ( मुसलमानांनीं ) सुरू केलेली हिंदुंची दुर्दशा खुद्द काजीच्या लक्षांत कशी येत नाहीं याचें त्यांना सखेदाश्चर्य वाटले. ' शरारत ना किसे करतूं ' हें तत्त्व प्रतिपादन करणारे काजीसाहेबच खुद्द या शरारतीचे ( वादविवादाचे ) आद्यप्रवर्तक आहेत ही गोष्ट त्यांनी काजीस मोठ्या मार्मिकपणें पटवितांच सर्वत्र हंशा पिकला. पंडित ह्मणतात—

## पृथ्वी

असें खचित जाहल्या जगतिं दोष कोठें नुरे ।
इलाहि[१]चिच हो ! पहा यवन हिंदु हीं लेकरें ॥
असोत पथ ते बहू परि जमीन ना वेगळी ।
विकारवश चित्त ना ह्मणुनि होउं द्यावें मुळीं ॥

---

१ पृथ्वी.

शेवटीं या वादाची अर्थात् उभय धर्मांच्या मूळ उत्पत्तीची मजल ऐतिहासिक कालनिर्णयावर येऊन ठेपली. काजीस कांहीं कालनिर्णय नक्की सांगता येईना. शेवटीं जगन्नाथ पंडितांनी उत्पत्ती वादाचे बाबतींत अखेरचा कालनिर्णय सांगताना ते जगाच्या आरंभकालाकडे आपली दृष्टी वळवून म्हणालें—

## श्लोक

न विशेषोऽस्ति वर्णानां सर्वं ब्राह्म मिदं जगत् ।
ब्रह्मणा पूर्वसृष्टंहि कर्म भिर्वर्णतां गतां ॥

ब्रह्मरचित मुळचा सर्व ब्राम्हवर्ग पुढील कर्मांच्या आचरणानें चातुर्वर्ण्यांप्रत पावला

### क्षत्रिय वर्णोत्पत्ति

कामभोगप्रियास्तीक्ष्णा क्रोधनः प्रियसाहसा ।
त्यक्त स्वधर्मा रक्तांगा तेद्विजः क्षत्रतांगतः ॥

### वैश्य वर्णोत्पत्ति

गोभ्योवृत्तिं समास्थाय पीताःकृष्यूप जीविनः ।
स्वधर्मान् नानुतिष्ठन्ति तेद्विजा वैश्यतांगताः ॥

### शूद्र वर्णोत्पत्ति

हिंसानृतप्रिया लुब्धा सर्व कर्मोपजीविनः ।
कृष्णा शौच परिभ्रष्टा ते द्विजा शूद्रतांगताः॥

याप्रमाणें आरंभाच्या ब्राम्हवर्गांतून वरील गुणकर्म विभागामुळें क्षत्रिय, वैश्य व शूद्र वर्ण निर्माण झालें.

इत्येते कर्मभिर्व्यस्ता द्विजा वर्णांतरंगताः ।
धर्मोयज्ञक्रिया तेषां नित्यं न प्रतिषिध्यते ॥

आतां याच्याहि पुढें अत्यंत नीच व अमानुषकर्माकडे ज्यांची प्रवृत्ति कायम झाली अशा लोकांचा संसर्ग वरील चातुर्वर्ण्यांत संकर करील म्हणून शेवटीं सृष्टीपालनकर्त्या विष्णुनी

### श्लोक

चातुर्वर्ण्यं मया सृष्ट्यं यस्मिन् देशे न विद्यते।
तं म्लेंच्छ देश जानीया आर्यावर्ता मतःपरा ॥

हें त्यांस बंधन घालून जगरूपी प्रचंड इमारतीतील केवळ देवघरच जें हें आर्यावर्त त्याचें अशा रीतीनें रक्षण केलें.

याप्रमाणें या आर्यावर्तांत पुढें जसें यदूपासून यादव झालें तसेंच अनुपासून म्लेंछ आणि तुर्वसूपासून यवन उत्पन्न झालें. सगरानें आपल्या पित्याचे राज्य हरण करणाऱ्या यवनांस ठार मारून त्याचा सूड घेईन अशी प्रतिज्ञा केली. त्यावेळीं शक, यवन, कांबोज, पारद, व पल्लव या जातींच्या पुढाऱ्यांनीं एकत्र जमून तें कुलगुरु वशिष्ठास शरण गेलें, तेव्हां वसिष्टांनी सगरास आज्ञा केली कीं तुझी प्रतिज्ञा खरी करण्यासाठीं मी या यवनादिका-पासून क्षात्रधर्माचा परित्याग करवून त्यांना स्वतंत्र धर्म स्थापन करून दिला आहे. अशा रीतीनें तात्कालिन चातुर्वर्ण्यांतून त्यांना बाहेर घालवून हिंदुंचा व त्यांचा सहवास कायमचा अलग करून दिला असल्यानें तें आर्यधर्मातून मृतच झालें असल्यानें आतां तूं त्यांना ठार मारू नकोस. सगरानें वसिष्ठाची आज्ञा मान्य केली आणि त्यावेळेपासून यवनानी इस्लामी धर्म स्थापून आपा-पली धर्मबंधनें स्वतंत्र ठरवून घेतली त्या काळांतील हैह्य तालजंघादि यवनांचे सामर्थ्य फार मोठें होतें. त्यांनींसुद्धां वसिष्टांची आज्ञा मान्य केली व तात्कालिन हिंदूशी ते ऐक्यभावानें वागूं लागलें. मग आपण सुद्धां आपापलें धर्म स्वतंत्र असतां असा धर्माचा कलह न वाढविता ऐक्यभावानेंच वागलें पाहिजे हें उभय धर्माच्या आज सतत नऊ दिवस चाललेल्या साधक बाधक चर्चेवरून सिद्ध होत नाहीं काय ?

याप्रमाणें पंडितरायाचे भाषण ऐकून काजीसाहेब निरुत्तर झालें एकहि यावनी पंडित खंडनार्थ पुढें येईना अशी स्थिती पाहून बादशहानें वाद संपाविला. पंडित जगन्नाथरायादि सर्व आर्य धर्म पंडितांना बहुमोल वस्त्रा-लंकार देऊन त्यांचा गौरव केला. सभा बरखास्त झाली व ‘ बोला सनातन धर्मकी जय ’ हा जयघोष सर्वत्र सुरू झाला.

सदर वादविवाद पाहण्यासाठीं मोठमोठ्यांच्या स्त्रियांही तेथें आल्या असून त्यांच्या बैठकीची वरील बाजूस उत्तम सोय केलेली होती. जयपूरचा राजा भगवानदास याची बहीण भानुमती ही अकबराची स्त्री असून अकबरापासून तिचे पोटीं लवंगी या नांवाची अत्यंत सुस्वरूप कन्या झाली होती. यावेळी तिचें वय १४ वर्षांचें असून आपल्या आईबरोबर तीही रोज हा वादविवाद पाहण्यास येत असे, पंडिताची ती नयनमनोहर मूर्ती व अलोट विद्वता पाहून :—

## श्लोक

भानूमतीची प्रियपात्र कन्या। रामा युवा सुंदर राजमान्या ॥
होती सभेलागि लवंगि आली। त्या पंडिता पाहूनि लुब्ध झाली ॥

शेवटीं तिनें तेथेंच आपल्या मनाशी :—

## आर्या

पंडित हा एक पति नर त्या विण भूवरील सर्व पिते।
स्वप्नी ही तनुस्पर्शा योग्य न सन्मान्य असति यद्यपि ते॥

अशी खूणगांठ बांधिली. खुणगांठ कोण नाहीं बांधणार ? कारणः—

## साकी

सुंदर वस्तू पाहुनि ऐकुनि अति रमणी या वाणी।
उत्सुक होतो मनुज तयाला कारण नाहीं कोणी ॥
स्मृति जननांतरिची। होते न कळत मनिसाची

ऋणानुबंधाच्या योगायोगाचा उदयकाल म्हणतात तो हाच.

वादविवादांत हिंदुधर्माचा जय होऊन इस्लामी धर्माचा पाडाव झाल्यानें तात्कालीन यावनी प्रजाही आपल्या धर्माविषयीं उदासीनता बाळगूं लागली. खुद्द अकबराच्या दिनचर्येत नवस करणें, हिंदुदेवतांस नारळ फोडणें, तीर्थ घेणें, गंध लावणें, इत्यादि हिंदूंच्या अनेक रूढी शिरून गोहत्या, गोमांसभक्षण, दाढी ठेवणें, चुलतबहिणीशी लग्न करणें, निमाज पढणें, मक्केची जत्रा हे प्रकार अगदीं बंद होत चालले अर्थात राजाप्रमाणें तज्जातीय प्रजाही बनत जाऊन शेवटीं तात्कालीन यवनावर :—

### श्लोक

न संध्या संधत्ते नियमित निमाजं न कुरुते ।
न वा मौंजी बंधं कलयति न वा सुंनत विधिम् ॥
न रोजां जानीते व्रतमपि हरेर्नैव कुरुते ।
न काशी मक्का वा शिव शिव न हिंदुर्न यवनः ॥

अशी सुभाषिते निर्माण होऊं लागली.

भामिनीचे उर्फ लवंगीचें प्राथमिक संस्कृत शिक्षण अकबरानें रामाचार्य नांवाच्या पंडिताकडून करवून घेतलें होते. तिच्या प्राचीन अनुवंशिक गुणकर्माप्रमाणें तिनें त्यांत फारच लवकर प्राविण्य मिळविलें. एकें दिवशी बादशाहा व पंडित करमणुकिकरतां बुद्धिबलाचा डाव खेळत बसले असतांना

### श्लोक

नृपा लागलीसे तृषा त्याच काळीं ।
म्हणे आण पाणी सुते भाग्यशाली ॥
जगन्नाथ पंतासि लाजू नको गे ।
कवी थोर भेटे मला हा सुभाग्यें ॥

लवंगीनें पाणी आणून दिलें व बादशहाचे आग्रहाने ती तेथेंच उभी राहिली. लवंगीला पुढील उच्च शिक्षण तुमच्याकडून देववावे व त्यासाठीं तिला तुमच्या सांनिध्यांत ठेवावी असा अकबराने आपला हेतू पंडितास कळवितांच त्यांनी लवंगीची थोडक्यांत परिक्षा पाहून गुरू शिष्य या नात्यानें तिला आतां प्रत्यक्ष शिकविण्याचे कांहीं कारण नाहीं. संस्कृत भाषेतील तिची तयारी बरी आहे. फारतर संस्कृत काव्यालंकार वगैरे वाचितांना तिला ज्या शंका येतील त्याचें केवळ स्नेहबुद्धिने मी निवारण करीत जाईन असें त्यांनी सांगितले.

संस्कृत व उर्दु या दोन्ही भाषांचे सुभाषित मिश्र श्लोक ऐकण्याची बादशहाची लालसा पूर्ण करणारा एक दिरगखान या नांवाचा तरूण कवी बादशहाच्या नित्य सहवासात राहात असे. आपल्या श्लोकाचा एखादा मासला ऐकवावा असे पंडितांनी त्यास सांगताच :—

## श्लोक

द्रष्टुं पुष्पवतीं नवातरुलता, मैतो गया बागमो ।
कौमारी मम जीवनाप्रिय सुधा, गुल तोडतीथी खडी ॥

त्यानंतर अवशिष्ट भाग पंडितांनी पुरा करावा असे त्याने सांगतांच :-

वृक्षस्य द्विजराजरूपगुणवान्, आशक हुई देखके ।
सा पुष्पागम मंडितापि विमला, औरत हुई गई चली ॥

याप्रमाणें पंडितांनी तो श्लोक पुरा केला.

भामिनीचा विवाह याच दिरंगखानाबरोबर करण्याचे अकबराने ठरविले असून तिला ते माहित होते. व भामिनीनें तर आपल्या वराची पूर्वींच खुणगांठ बांधून ठेविली होती. त्यामुळें तिच्या मनांस मोठी चिंता उत्पन्न झाली. तात्विक अभ्यासाच्या निमित्तानें तिनें आपलें जाणें येणें पंडिताकडे वरचेवर बरेंच वाढवून आपल्या सर्व जिज्ञासा तृप्त करण्यांस आपणांस पंडितराय पति करणेंच अत्यंत आवश्यक आहे हा निश्चय तिनें ठरविला व पंडितराय हें तत्वनिष्ठ सिद्ध पुरुष असल्यानें अर्थात जनतेच्या सामान्य धर्मबंधनाच्या पलिकडे त्यांची मनोवृत्ती गेल्यामुळें अभेद बुद्धीनें माझा प्राचीन गुणकर्म संस्कार ओळखून ते मला आपल्या पदरी घेतील अशी तिची खात्री होती. व हा योग जुळवून आणावा कसा याच चिंतनिकेंत तिचें मन रात्रंदिवस गढून गेलें होते.

एके दिवशी मध्यरात्री तिनें गुतरीतीनें पंडितांच्या सुखनिवासांत येऊन पंडित निद्रावश असतां त्यांचें पायावर आपलें डोके ठेऊन त्यास जागृत केलें.

पंडितराय तो प्रकार पाहून ह्मणाले—

### पद [ ते कुटिल कपटी काक ]

हें खचित उचित तुज न सुंदरी । रात्र फार, तिमिर घोर
समयीं अशा कार्य काय, वृत्ति बावरी ॥ धृ० ॥
नृपवर तव तात थोर । परम धीर शूर वीर ।
कळतां कीं करिल वैर । मारक हें न करी ॥ १ ॥

भामिनी—

अं. गीत

रूप मनोहर सुंदर आपुले । विद्याविनयें भूषित केलें ॥
वादविवादी यश मेळविले । ऐसे श्रेष्ठ कवी ॥
उत्तम शिक्षण मजला दिधले । परम नीतिचे तत्व शिकविलें
तन मन धन हें मी अर्पियले । नाथा पद कमलीं ॥

पद [ कुणि काही नका शिकवूं अतां ]

अंगिकार करा प्रिय नाथा । जगीं नाहीं तुम्हां विण त्राता ॥
आजि झाले आपुली कांता । मान्य होईल हें मम ताता ॥
भुक्ति मुक्ति ही साधुनि लोकीं । कीर्ती दुंदुभि गाजवूं नाकीं ॥
वन्ही सोडिल आपुल्या दाहा । निश्चय न टळे तरि माझा हा ॥

असा तिचा निश्चय ऐकून पंडितराय मोठ्या विचारांत पडले. धर्म शास्त्राची तीव्र बंधनें आड येत असल्यानें त्यांनी तिचें ह्मणणें मान्य केलें नाहीं. तेव्हां भामिनी म्हणाली महाराज आपण सर्वज्ञ असून माझ्या गुणकर्मानुसार उत्पन्न होणाऱ्या परंपरागत वासनेची यथार्थ जाणीव माझ्या इतक्या दिवसांच्या प्रत्यक्ष सहवासानें आपणांस झाली नाहीं असें मी कसें ह्मणूं बरें ? निदान आर्यांच्या तत्वज्ञानप्राप्तीच्या मार्गांत आडव्या येणाऱ्या या माझ्या यावनी देहास आपल्या सहवासानें तरी पवित्र करा.

लवंगीचें हें लाघवी भाषण ऐकून पंडितराय हांसत म्हणतात भामिनी केवळ कामांध होऊन स्वार्थ साधण्याच्या कृत्रीम प्रेमानें हें तू कांहीं तरी बरळत आहेस. ‘ इहंते कामभोगार्थान् ’

पद [ झंपा ]

असे आसुरी लोक ते नरकिं पडती ।
कामभोगासि जे स्वर्ग ह्मणती ॥ धृ० ॥
नष्ट आत्मा असुनि । क्षुद्र बुद्धिस वरुनि ।
उग्र कर्मं करुनि । क्षयाचि जगती ॥ १ ॥

भोग भोगाशानें । सक्त तें आमरणीं

अपरिमित चिंतनीं । व्यर्थ मरती ॥ २ ॥

म्हणजे जे पापी असतात ते आपली एकट्याची कामवासना तृप्त करण्यासाठीं अखंड धडपड करीत असतात. पण धर्माची योजना सर्व मनुष्य प्राण्यांनी 'भूतप्रियहितेह' व्हावें म्हणून आहे. सर्वांच्याच अंतःकरणांत ही भावना उत्पन्न झाली म्हणजे सर्वांनीच सर्वांशी समतेनें वागावें हें तत्व अत्युच्च कोटीतलें आहे. सर्व सृष्टी परमात्म्यामध्यें आणि परमात्मा सर्व सृष्टीमध्यें भरला आहे असें जो पहातो त्याला कांहीं शंका येत नाहीं.

पद [ बागेश्री – त्रिवट ]

सर्वां घटि भरला नारायण ।

नारायणि तशि सृष्टिहि सकला ॥धृ०॥

ऐसे जो नर पाहि विचारुनि

कांहीं न शंका येत तयाला ॥ १ ॥

भामिनीः— पण महाराज सर्वांच्याच अंतःकरणांत जर ही भावना उत्पन्न होईल तर मग जगांत कोणत्याही प्रकारचे दुःख व पाप शिल्लक राहणार नाहीं मग जन्ममरण चक्राची गती नष्ट झाल्यानें जगाचें अस्तित्व नष्ट नाहीं कां होणार ? पण जो पर्यंत हें चक्र सुरू आहे, अहंभाव नष्ट झालेला नाहीं तो पर्यंत ही दृष्टी सर्वांस प्राप्त होणें शक्य नाहीं आणि म्हणूनच जगांतील माझ्या सारख्या या मार्गावर येऊं पाहणाऱ्या तत्वनिष्ठ जीवाचा उद्धार आपणां सारख्या

विद्या विनय संपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनी ।

शुनिचैवश्वपाकेच पंडिताः समदर्शिनः ॥

समदर्शिन् पंडितांच्याच अखंड सहवासानें होणें यावेळीं इष्ट आहे.

पंडितः— भामिनी, स्वार्थ भक्तिपरायण लोक आपलें कार्य साधण्यासाठीं काय वाटेल ते प्रतिपादून शेवटीं आपलें उग्र स्वरूप प्रगट करितात आणि त्यायोगे कार्यकारी पुरुषांवर नानाविध संकटें उत्पन्न होऊन तो हताश होतो. अशातला अर्धवट मी नव्हे तुझ्या या पापी वासनेस व मायावी तत्व

प्रतिपादनास मी मुळीच बळी पडणार नाहीं. हे पंडितांचें निर्वाणचिं भाषण ऐकून भामिनीनें अशा स्थितींत जगण्यापेक्षां मनानें वरिलेल्या पति देवतेस आत्मार्पण करणेच श्रेयस्कर असें म्हणून तिनें आपल्या जवळचा खंजीर काढला आणि तो उरांत मारून घेणार तोंच पंडितांनी तिच्या हातांतील खंजीर काढून घेतला. भामिनी निचेष्टित भूमीवर पडली. शेवटीं पंडितांनी वाग्देवीचा धावा करून तिच्या ध्यानांत ते निमग्न झालें अखेर देवी

**पद ( झंपा )**

तुष्ट होऊनि तदा प्रगट झाली ।
तेज कोंदाटलें भू नभोमंडळीं ॥
मुगुट रत्नाकरि कोटि सूर्यापरी ।
शीत चंद्राहुनी तेजशाली ॥
पंडिता ती वदे नभय धरि मानसी ।
पत्निगत ही तुझी येथ आली ॥
अंगिकारुनि हिला उद्धरी या जनीं ।
होइ कीर्ति तुझी विजयशाली ॥

हा देवीचा आत्मसाक्षात्कार पाहून पंडितांनीं आपलें ध्यान विसर्जन केलें व इच्या शुद्धमनोभूमीची झाली तितकी परीक्षा पुरें आहे असें ह्मणून तिला सावध करून तिच्या म्हणण्यास रुकार दिला. हा आकस्मिक प्रकार पाहून भामिनीला अत्यानंद झाला व बादशहाजवळ आतां आपण माझी उघड उघड मागणी करा. मी आंतून सर्व तयारी करून ठेविते आणि मग

**साकी**

ताताज्ञेने विधिपूर्वक मज स्वीकाराविं विवाहीं ।
ह्रदय मंदिरीं नित्य वसो की परमदिव्य मूर्ती ही ॥
येतें मी आतां । राहो याची स्मृति नाथा ॥

असें सांगून ती निघून गेली.

अकबर हा पंडितरायाच्या दृढ सहवासानें हिंदु धर्मातील उदात्त, परमोच्च तत्वास अनुसरून एक हिंदु यवनांना सर्व संमत असा नवीनच समता धर्म स्थापन करण्याच्या विचारांत होता.

एके दिवशी पंडितराय व अकबर नित्याप्रमाणें बुद्धिबलाचा डाव खेळत असता सभेत वाद जिंकिल्याबद्दल इच्छेस येईल ते बक्षिस मागा असें अकवराने पंडितरायास म्हणतांच पंडित म्हणाले—

## आर्या

नलगे तुरंग गजरथ न तोष माने सुसौख्य मानी न ।
कुरंगनयना द्यावी हिजला सतिधर्मिं पूर्ण रिझवीन ॥

## श्लोक

न याचे गजालिं न वा वाजि राजीम् ।
न वित्तेषु चित्तं मदीयं कदाचित् ॥
इयं सुस्तनी मस्तका कन्यकुंभा ।
लवंगी कुरंगी दृगंगी करोतु ॥

बादशहाः— असें असेल तर

## शिखरिणी

लवंगीच्या ताटीं बसुनिच तुम्ही भोजन करा ।
तरी देऊं आम्हीं मिळवुनिहि तीच्या करि करा ॥
जगन्नाथाने हें परिसुनि तया उत्तर दिलें ।
विधर्मी होतीना सुजन कधिं सद्वंशज भले ॥
स्वपित्यांच्या पुण्यें करिन तिजला ब्राह्मणि त्वरें ।
लवंगीचें साजे प्रखरतर वा पुण्याचि खरें ॥
नृपाला कीं माते यवन तरि ही तीच करिल ।
विधात्यानें भाळीं लिहिलि वधु जी तीच वरिल ॥
स्वजाती माझारी बहु वधु, नसे न्यून्य वरण्या ।
परी इच्छा झाली यवन वधु उद्धार करण्या ॥

जरी लोहासंगे घडत परिसाचे विरुपम ।
तरी ईच्या संगे मदिय कुल तें होय अधम ॥

लवंगीनें पंडिताच्या संगतीत केवळ आत्मोद्धारासाठींच रहाण्याचें अटीवर बादशहाने आपली मुलगी त्यांस दिली.

## आर्या

दिधली कन्या धन्या तुजला मोदें अती गुणागारा ।
झाले मान्य वचन जे प्राणहि जातां न घेऊं माघारा ॥

असें करण्यांत बादशहाचा अंतर्गत हेतु असा होता कीं लवंगीसारख्या सुस्वरूप लावण्य लतिकेच्या मोहजालांत पंडितराय हे केव्हातरी सहज सापडतील व अशा रीतीनें ते धर्मभ्रष्ट झाले कीं आपल्या नवीन समता धर्माच्या कार्यांत त्यांचें आपणांस प्रत्यक्ष सहाय्य पुष्कळ मिळविता येईल. पण गैरकाय म्लेंछ वधूच्या नादी लागून आपल्या सर्वस्वावर पाणी सोडून आपल्या सत्कुलाची अपकीर्ति जगभर मिरवित भटकणाऱ्या सांप्रतच्या प्रवाह पतित जनते इतकी भयंकर अधोगती तात्कालीन विधर्मी सत्तेतही आमची झालेली नव्हती हे लक्षांत ठेवण्या सारखे आहे. केवळ सत्तेनें अथवा विशिष्ट समाजाच्या मदतीनें ही नवीन सोइस्कर धर्मग्रंथ निर्माण करणें अथवा समता धर्म स्थापन करणें ही गोष्ट सामान्य नव्हे हे अकबराच्या कृतीवरून सहज ध्यानी येण्यासारखे आहे अशा कार्यार्थ परमेश्वरी इच्छेनुरुप आत्मानुभवी अधिकारच भूतलावर यावे लागतात

अकबर बादशहानें लवंगी व पंडितराय यांस एकल राहण्याकरितां एक भव्य महाल तयार करून देऊन तेथें त्यांची सर्वप्रकारें बडदास्त उत्तम ठेविली पंडितरायांनीं लवंगीच्या भक्तिमार्गाची दिनचर्या तिला व्यवस्थित आंखून दिली होती.

एके दिवशी लवंगी पंडितास म्हणाली—

## श्लोक

पतिव्रता धर्म समग्र आतां । वदा मला दाउनि शुद्ध पंथा ॥
गेल्या सती मुक्तिपदासि जैशा । जावें तसें मी मनि हीच आशा ॥

ही तिची इच्छा पंडिताकडून पूर्ण होऊं लागली. नित्यनेमाप्रमाणें समाधी लावून पंडितराय बसले आहेत. जपमाळ हातीं घेऊन नामस्मरण करीत लवंगी त्यांचे समोर एकाग्रवृत्तीने उभी आहे तोंच तिच्या तेथें आलेल्या कांहीं मैत्रिणींनी तिची थट्टा करण्याच्या हेतूनेः—

श्लोक

लवंगीसि अंगावरि पंडिताच्या ।
दिले लोटुनी त्या क्षणीं सुव्रताच्या ॥
अती जाहला दाह तो सर्व देही ।
न जाणे परी नाथ काही विदेही ॥
तरारून येती शरीरास फोड ।
तसें लाल झालें तिचे सर्व तोंड ॥

समाधी उतरतांचः—

श्लोक

घेवोनी जळ हाति सिंचि नयनीं तैसेंच अंगावर ।
स्फोटाच्या वरि तेवि बिंदु पडतां ते लोपलें सत्वर ॥
बोले पत्नि प्रिया नकोच वसणे येथें चला काशिला ।
येता मृत्यु तिथेंचि सार्थक मनीं होईल वाटे मला ॥

काशींत प्रवेश करितांच तेथील ब्रम्हवृंदांनी या दंपत्यावर पूर्ण बहिष्कार घालून त्यांस गावांत येण्यास मनाई केली. पूर्वीपासून वादपराजित काजीपुत्र रहीम, लवंगीचा ठरलेला पती दिरंगखान व हरदीक्षित इत्यादिकांनी या दंपत्याचा अमानुष छळ गुप्तपणें चालविलाच होता काशीत तर या छळाची परमावधी झाली. कांहीं ब्राम्हणांनी पंडितांना प्रायश्चित्त घेऊन शुद्ध हो असें सांगतांच पंडित म्हणाले—

ओवी

लवंगीसह करा शुद्ध । मी तिच्या भक्तींत बद्ध ॥
ऐकोनि भाषण हें विरुद्ध । क्रोधे द्विज खवळती ॥

अप्पय्या दीक्षिता वळलें । ते पंडितासी येऊन भेटले ॥
त्यांनीं पंडितासी बोधिले । स्पष्ट शद्बें करोनि ॥

## आर्या

सूज्ञा यावनि ब्राम्हिण व्हावी कैशी मला न हें कळतें ।
शास्त्राधार न त्याला कुसंगतीनें अशाच कुल मळते॥

शेवटीं काशीतल्या पंडितांची धर्मशास्त्र पारंगता थोडक्यांत लक्षांत घेऊन व

प्रायो नाम तपः प्रोक्तं चित्तं निश्चय उच्यते ।
तपो निश्चय संयोगात् प्रायश्चित्तमितीर्यते ॥

या तात्वीक दृष्टीनें प्रायाश्चित्त म्हणजे तपोनिश्चय यांतील मर्म ओळखून त्या दोघांनी प्रत्यक्ष गंगामाईकडूनच आपलें खरे खरे शुद्धिकरण करवून घेऊन जनतेतील प्रायश्चित्ताचे बाबीत असलेला भ्रमानिरास करावा या हेतूने आपल्या वयाच्या ९२ वें वर्षी म्हणजे शके १५६४ च्या जेष्ठ शु॥ १ स काशीतील आत्मवीरेश्वराच्या ५२ पायऱ्या असलेल्या घाटावर भामिनीसह तपश्चर्येस बसून स्वकृत गंगालहरी (५२ श्लोकी) ची दररोज १०० याप्रमाणें जेष्ट शु॥ १० अखेर एक हजार पारायणे केली. त्यावेळीं प्रतिवार्षीक गंगोत्सव तेथें चालू होतांच. या दहा दिवसाच्या कालांस दशहरा अशी धर्म संज्ञा आहे.

## श्लोक

अदत्तानामुपादानं । हिंसा चैवाविधानतः ।
परदारोप सेवाच कायिकं त्रिविधं स्मृतम् ॥
पारुष्यमनृतंचैव पशुन्यंचापि सर्वशः ।
असंबद्धप्रलापश्च वाङ्मयंस्याच्चतुर्विधं ॥
परद्रव्येष्वभिध्यानं मनसानिष्ट ।चिंतनम् ।
वितथाभिनिवेशश्च मानसं त्रिविधं स्मृतम् ॥

त्रिविध कायिक—१ दिल्यावांचून वस्तु घेणें २ शास्त्राज्ञेवांचून हिंसा करणें ३ परस्त्री गमन.

चतुर्विध वाचिक—१ कठोर भाषण २ खोटें बोलणें ३ चहाडी सांगणें ४ असंबद्ध बोलणें.

त्रिविध मानसिक—१ परद्रव्यहरण विचार २ दुसऱ्याचे वाईट इच्छिणें ३ एखाद्या वस्तुविषयी खोटा आग्रह धरणें.

ही दशविध पातकें होत. दशहरांतील गंगास्नानानें यांचा नाश होते. पारायणद्वारें नाथ गंगेची प्रार्थना करितात.

**पद** [ वंदन त्या ईशा ]

श्री मंगल गंगा, अभंगा ॥ शिवोत्तमांगा जी सुभगा ॥ धृ ॥
श्रीधर चरण क्षालन शीला ।
स्वर्गी सुरवर पूजित विमला । सज्जन मज्जन दुर्जन तरला ।
उद्धारि अधमाधम पतिताला ।
वन्दू ऐशी सागरगा ॥ श्री मंगल गंगा ॥

**गंगा लहरी श्लोक**

समृद्धं सौभाग्यं सकलवसुधायाः किमपितन् ।
महैश्वर्यं लीला जनित जगता खंडपरशोः ॥
श्रुतीनां सर्वस्वं सकृतमथ मूर्तं सुमनसाम् ।
सुधा सौंदर्यंते सलिलमशिवं नःशमयतु ॥

**पद** ( अवनकरो तुमचे )

दुरित लया नेवो । असें तें पावन तवजल गंगे अमुचे॥ धृ०॥
सौभाग्यचिजें या वसुधेचे ।
सर्वस्वच गे जेंहि श्रुतींचें ।
साक्षात्पुण्य सुरांचें । श्वेत सुधेसम तेज जयाचें ।
॥ दुरित० ॥

पद श्लोक २९ [ पुष्पपराग ]

अगणित संशय युक्त नराधम ।
जे त्यजिती अघ संचय हा ॥

...दुरितांचे केवळ ।
बिकट समूहागार हा ॥ धृ० ॥
त्या माझ्या तारणिं तूं गंगे ।
प्रबळ दृढ कटी कसली ।
स्तोत्र पठण तव सतत कराया ।
नर पशुसम मी शक्त न हा ॥

पद श्लोक ५२ ( भैरवी, पंजाबी, काय करूं नशिबातें)

शुद्ध करो मम अंगा । शिवत्तमांगा भूषवि गंगा ॥धृ०॥
दर्शनमात्रें पाप हरी जी । बहुजन संकट भंगा ॥
तारायाजी तुंग मनोहर । उसळी चपल तरंगा ॥

अखेरचे पारायण सुरू होतांच प्रत्येक श्लोकांस गंगा एकेक पायरी वर चढू लागली. हा चमत्कार पाहण्यासाठीं घाटावर हजारो लोक जमा झाले बावन्नावा श्लोक पूर्ण होतांच गंगेनें बावन्नावी पायरी ओलांडून उभयतांस सचैल स्नान घातलें. इतक्यांत गंगाजलांत गंगेने आपलें चतुर्भुज दिव्य रूप प्रगट केलें तें पाहतांच उभयतानीं उभे राहून प्रार्थना केली.

पद [ माझाभरत ]

आलो जननी शरण तुला, निजवी तूं अंकी ॥
प्राशुनि नीर तुझे आह्मी दीन । रमलो जगतीं या मतिहीन॥
परि गे बहुत पावलो शीण । देई आधार दीनाला ॥१ ॥

भामिनीची गंगेस प्रार्थना

श्लोक

सुरधुनि नृपकन्ये पुण्यवंतं पुनासी ।
स तरति निजपुण्यैः तत्रकिंते महत्वम् ॥
नृपवर कुल जातां यावनी मा पुनासी ॥
तदिह तव महत्वं तन्महत्वं महत्वम् ॥

याप्रमाणें उभयतांची दिव्य धर्मनिष्ठा पाहून श्री गंगामाउलीने आपल्या एका स्कंधावर पंडितराय व दुसऱ्या स्कंधावर भामिनीस बसवून हजारो लोका-

२०० काव्य



समक्ष तिने त्यांना शेवटीं आत्मस्वरुपांत मि ... ाचा उद्धार केला यथार्थ धर्मज्ञानप्राप्तीच्या मार्गाने होणारा हाच तो आत्मोद्धार वः—

उचीत जाणावे मुख्य धर्म आधी ।
चित्त शुद्धि बुद्धि ठायी स्थीर ॥

या लक्षणांनी युक्त अशा वैष्णवांचें हेंच तें शुद्धिकरण.

वायूच्या लहरीप्रमाणें ज्यांचे विचार क्षणोक्षणीं बदलतात, धर्म कशाबरोबर खावा हें ज्यांना कळतच नाहीं, समर्थांच्या राजकारणाशी ज्यांची फारकत झाली आहे, तुकोबांची अभंगवाणी ज्यांच्या कार्याआड येते इतकेंच नव्हे तर स्वकार्य यशस्वितेच्या पायी ज्यांनी देहात्म दृष्टिवादाने अधर्मास धर्म भासविण्याचे कार्य चालविलें आहे ज्यांचा उच्चार, विचार व आचार याशी केव्हांच मेळ बसत नाहीं. मानवी सामर्थ्याची ज्यांची गती सर्व बाजूनी कुंठित झाली आहे, प्रतिस्पर्ध्याबरोबर दोनहात करण्याचे आत्मीय स्वसामर्थ्य जे आज आपल्याच स्वहस्ते गमावित आहेत ज्यांच्या कार्यास भगवंताचे अधिष्ठान नाहीं अशाच अनाधिकाऱ्यानी चळवळीच्या या अनेकविध पवित्र कार्यांत भाग घेतांना आपली या कार्यातील ध्येयनिष्ठा प्रथम आपल्याशी अजमावून पहावी हिंदुधर्म हा आपल्या पंडितासारख्या एका दिव्य भक्ताकडूनही जगांतील सर्व मानव जातीच्या धर्मांचे आपल्यांत सांठवण करण्या इतका सर्वश्रेष्ठ परंतु त्यांच्या दिव्य तत्त्वांची नुसता शाब्दिक बडेजाव मिरवल्यानें काय होणार ती तत्वें स्वतःच्या ठिकाणीं प्रकाशित करणें आज अत्यंत जरूर असून त्यासाठीं सर्वस्व त्याग व तपाचरण ही क्रिया प्रथम अमलांत आणून पूर्वोक्त अभंगांत वर्णन केल्याप्रमाणें आम्हीं आत्मानुभवी विष्णुदास बनलें पाहिजे तेव्हांच—

पुनित केलें विष्णुदासी । संगे आपुलिया दोषी

हा अधिकार प्राप्त होतो. या अधिकार प्राप्तीसाठीं प्रभूजवळ जी मागणी मागावयाची ती हीच

हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा

आर्ती

प्रार्थना

**श्री सीतारामचंद्रार्पणमस्तु**